विनम्र अभिवादन



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल २०२३ या जयंतीनिमित्त त्यांना भावपूर्ण आदरांजली!

डॉ. आंबेडकर यांनी कामगार वर्गासाठी केलेले कार्य आणि धोरण याविषयी आढावा घेणारा अनुज केसरकर लिखित यांचा विश्लेषणात्मक लेख पान ४ वर



# कर्मचारी टाइम्स

• मुंबई, १, एप्रिल २०२३ • वर्ष - १, अंक ३ • पाने ८ • किंमत १० रुपये फक्त

शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त

Title Verification No. 52028 dated 11/10/2022 Received by Ministry of Information and Broadcasting, Government of India

www.karmacharitimes.com • संपादक - श्री. एम. एम. उर्फ भाऊसाहेब पठाण Email - karmacharitimes@gmail.com



'कर्मचारी टाइम्स'

KARMACHARI TIMES1

ALL-IN-1 QR CODE

वर्गणीदार व्हा...


## शासकीय कर्मचाऱ्यांच्या एकजुटीचा विजय



**मुंबई :** जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीसाठी राज्यभर शासकीय कर्मचाऱ्यांनी अभूतपूर्व बेमुदत संप करून जी एकजूट दाखवली त्याचा अखेर विजय झाला आणि राज्य शासनाने जुनी पेन्शन योजना लागू करण्यास सकारात्मकता दाखवली. लाखो कामगारांनी सात दिवस बेमुदत संपाच्या केलेल्या आंदोलनाचे हे फलित असून येत्या तीन महिन्यात या निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आश्वासन दिले. त्यामुळे राज्य सरकारी, निमसरकारी आणि शिक्षक व शिक्षकेतर अशा संघटनांच्या समन्वयक समितीचे निमंत्रक असलेले विश्वास काटकर यांनी हा संप मागे घेत असल्याचे जाहीर केले.

संप मिटल्याने सर्वांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. जनतेनेही कर्मचाऱ्यांच्या भावना विचारात घेऊन संपकाळात त्यांना पाठिंबा दिला. दरम्यान, अवकाळी पाऊस तसेच जनतेची होत असलेली गैरसोय विचारात घेऊन शासकीय कर्मचारी वर्गाने आपला संप मिटल्यानंतर शिल्लक राहिलेली कामे पूर्ण करून जनतेला दिलासा दिला आहे.

जुनी पेन्शन योजना लागू करावी, अशी कर्मचाऱ्यांची मागणी होती. केंद्र सरकारचा जुन्या पेन्शन योजनेला विरोध आहे. नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत रुजू झालेल्या राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना नवीन अंशदायी पेन्शन लागू करण्याचे केंद्र सरकारचे पाप आहे. राज्यातील विद्यमान संरकार केंद्र सरकारच्याच पंखाखाली आहे. पण संपाचे अर्थसंकल्पीय अधिवेशनात उमटलेले पडसाद आणि कर्मचाऱ्यांची अभेद्य युती यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेल्या सूचनेनुसार राज्याच्या मुख्य सचिवांनी तातडीने निमंत्रण देऊन समाधानकारक चर्चा केली तसेच लेखी आश्वासन दिले.

केंद्र सरकारच्या निर्णयामुळे जुनी पेन्शन योजना देणे शक्य नाही परंतु जुन्या पेन्शनच्या धर्तीवर पर्यायी पेन्शन योजना आणताना सध्याच्या अंशदायी म्हणजेच एनपीएसधारकांना जुन्या पेन्शनचा लाभ घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारकांप्रमाणेच सर्व लाभ मिळतील, अशी हमी मुख्यमंत्र्यांनी राज्य सरकारच्या वतीने दिली आहे. पर्यायी योजनेला नवीन नाव असेल. काही राज्यांचा अभ्यास करून नव्या पर्यायी योजनेमुळे राज्य शासनावर वित्तीय भार किती येईल, नवीन वित्तीय भार प्रशासन कसा सहन करेल, याचा अभ्यास त्रिसदस्यीय समिती करणार आहे, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले आहे.

संपाला विधिमंडळातील आमदारांनी, कामगार संघटना, विविध राजकीय पक्ष, स्वयंसेवी संघटना, प्रसारमाध्यमे यां सर्वांची साथ मिळाली. शासनावर दबाव वाढत गेला. दरम्यान संपात यशस्वी तोडगा काढल्याबद्दल याबाबत महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघ, राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत.

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी संप मागे घेतल्याच्या निर्णयाचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीदेखील स्वागत केले आहे. जुन्या पेन्शनच्या संदर्भात विचार करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीचा अहवाल लवकरात लवकर प्राप्त होईल आणि त्यावर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी विधानसभा आणि विधानपरिषदेत निवेदनाद्वारे जाहीर केले.

निवेदनात त्यांनी म्हटले की, महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाने २८ मार्च पासून संपावर जाण्याबाबत राज्य शासनाला नोटीस दिली होती. अगोदरच राज्यातील कर्मचारी संपावर गेले असताना अधिकारी महासंघदेखील या आंदोलनात सहभागी होत असल्यामुळे परिस्थिती अधिकच बिघडली असती. त्यामुळेच मुख्य सचिवांना निर्देश देऊन तत्काळ बैठक बोलावण्यात आली. या बैठकीत राज्य शासनाने केलेल्या आवाहनाला कर्मचारी व राजपत्रित अधिकारी संघटनांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. बैठकीत राज्यासमोर असलेल्या आव्हानांचा विचार करून सर्व संघटनांनी संप मागे घेतल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांचे स्वागत केले.




## पेन्शनच्या तौलनिक अभ्यासासाठी समिती

**मुंबई :** राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना आणि जुनी निवृत्तीवेतन योजना यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी तीन सदस्यीय समितीची स्थापना करण्यात येत असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत केली. ही समिती तीन महिन्यात आपला अहवाल सादर करणार आहे.

या समितीमध्ये भारतीय प्रशासकीय सेवेतील सेवानिवृत्त अधिकारी सुबोध कुमार, के. पी. बक्षी, सुधीरकुमार श्रीवास्तव यांचा समावेश असेल. तसेच लेखा व कोषागरे विभागाचे संचालक हे या समितीचे सचिव म्हणून काम पाहणार आहेत. तीन महिन्यांत उपाययोजनांबाबतची शिफारस शासनास सादर करेल.

या विषयावर राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना आणि त्यांच्याशी संलग्न असणाऱ्या वेगवेगळ्या कर्मचारी संघटनांनी राज्य शासनाला निवेदन देऊन जुनी निवृत्तीवेतन योजना त्वरित लागू करण्याची मागणी केली आहे. या मागणीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत निवेदन केले.

महाराष्ट्र राज्य शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांना निवृत्तीनंतर सुरक्षित, सन्मानजनक आणि आरोग्य संपन्न जीवन मिळावे, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येतील, हे शासनाने तत्वत: मान्य केले आहे. संघटनांच्या मागणीनुसार या विषयावरील बैठकीत राष्ट्रीय व जुनी निवृत्तीवेतन योजना यांचा तौलनिक अभ्यास करून समिती नेमून, समितीने त्या अनुषंगाने शासनास अहवाल सादर करण्याबाबत निर्णय दिला आहे. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले की, शासन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत पूर्णपणे चर्चेला तयार असून सकारात्मक निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

## संजय गायकवाड विरोधात कायदेशीर कारवाई होणार

**मुंबई :** सरकारी कर्मचारी यांना सरसकट भ्रष्टाचारी म्हणून प्रतिमा मलिन केल्याने राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या वतीने कायदेशीर कारवाईची नोटीस बजावण्यात आली असून कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांनी दिला आहे.

संघटनेच्या वतीने अध्यक्ष भाऊसाहेब पठाण आणि उपाध्यक्ष सुरेश आहेरकर, कार्याध्यक्ष भिकू साळुंखे, सरचिटणीस प्रकाश बने, सचिव बाबा कदम यांनी सह्यानिशी लेखी तक्रारीद्वारे विधानसभा



अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. कर्मचारी वर्गाची अशी अवहेलना करत त्यांनी आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे.

आमदारांचा खर्च ५ लाखांचा असतो. असे त्यांनी म्हटले आहे. महिना १.४२ लाख रुपये पगार असून ५ लाख रुपये कसा करू शकतात, त्यांची वरकमाई असते का, असा सवाल कर्मचारी वर्गाकडून व्यक्त होत आहे.

## बाह्ययंत्रणेकडून सेवेचा शासन निर्णय निर्गमित

**मुंबई :** प्रशासकीय खर्च आटोक्यात ठेवण्याचे कारण देत शासनाच्या वतीने अतिकुशल, कुशल, अर्धकुशल, अकुशल या वर्गवारीतील कर्मचारी भरती बाह्ययंत्रणेकडून करण्यात येणार असून तसा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यासाठी मे. ब्रिस्क फॅसिलिटिज प्रा. लि. आणि क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस प्रा. लि. या दोन संस्थांना तीन वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्त करण्यात आले आहे. या निर्णयामुळे भविष्यात सरळसेवा भरती तसेच अन्य नियुक्त्या कितपत होतील किंवा त्या संपुष्टात येतील की काय, अशा चर्चा सध्या शासकीय कर्मचारी वर्गात आहेत.

## याला म्हणतात प्रेरणा

### चिमुकल्याच्या भविष्यासाठी आई संपात सहभागी




## शासकीय कर्मचाऱ्यांना काळजी घेण्याचे आवाहन

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना आपल्या घरापासून कामाच्या ठिकाणी येत असताना सार्वजनिक वाहनांमधून आणि स्थळांमधून प्रवास करावा लागतो. तेव्हा गर्दीचा प्रादुर्भाव त्यांना सहन करावा लागतो. कार्यालयात नागरिकांचीही मोठ्या प्रमाणावर ये-जा असते. अशावेळी कुणी संसर्गबाधित आहे की नाही, हे कळत नाही. सध्या एच३एन२या एन्फ्लूएंझा या आजाराची भीती वाढत असून कर्मचाऱ्यांनी पुरेपूर काळजी घ्यावी, असे आवाहन राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे नेते भाऊसाहेब पठाण यांनी कर्मचाऱ्यांना केले आहे.

## राज्य सरकारी चतुर्थश्रेणी कर्मचारी प्रलंबित मागण्यांबाबतही आग्रही

**मुंबई :** राज्य सरकारी कर्मचारी जुन्या पेन्शन योजनेबाबत आंदोलन करत असले तरी राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाने आपल्या प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेबाबतही आग्रही असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

जुन्या पेन्शन योजनांबाबत चतुर्थश्रेणी कर्मचारी वर्गाने आंदोलन केले होतेच परंतु त्यासोबत त्यांच्या इतर प्रलंबित मागण्यांची सोडवणूक व्हावी, हाही या आंदोलनाचा एक भाग होता. पेन्शनच्या मुद्याबाबत शासकीय कर्मचारी वर्ग आता समाधानी आहे. कारण ती लागू करण्याबाबत शासनाने सकारात्मकता दर्शवली आहे. आता शासनाने चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवावेत, अशी अपेक्षा आहे.

यासंदर्भात १९८१ चा शासकीय अध्यादेश पुनर्जिवित करणे, कर्मचाऱ्यांच्या वारसाला सरळसेवेतून नोकरीत सामावून घेणे, सर्व विभागातील रिक्त पदे भरावीत, अनुकंपा तत्वावर भरती, बदली कामगार किंवा कंत्राटी कामगार यांना एक वेळची विशेष बाब म्हणून सेवेत कायम करणे या प्रलंबित मागण्यांची सोडवणूक व्हावी, असे आवाहन संघटनेचे नेते भाऊसाहेब पठाण यांनी केले आहे.

## सरकारी कर्मचाऱ्यांना आर्थिक स्थैर्य देणाऱ्या संस्थेचा नामविस्तार

## दि महाराष्ट्र मंत्रालय शासकीय कर्मचारी को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि.

- कर्जावरील व्याजात ११% वरून १०% कपात
- महाराष्ट्रभर शाखांचा अधिकाधिक विस्तार
- मयत सभासदांच्या वारसांना २० हजारांची मदत

**मुंबई :** शासकीय कर्मचाऱ्यांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी कटिबद्ध असलेल्या दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेचा नामविस्तार होत असून आता या बँकेला दि महाराष्ट्र मंत्रालय शासकीय कर्मचारी को-ऑप. क्रे.सो.लि. असे संबोधिण्यात येईल. याबाबतचा निर्णय मंत्रालय येथील परिषद सभागृहात झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आला. याचवेळी सभासदांसाठी विशेष बाब म्हणजे कर्जावरील व्याज ११ टक्क्यांवरून १० टक्के इतके कमी करण्याचा महत्वाचा निर्णय देखील संचालक मंडळाकडून घेण्यात आला आहे. त्याचबरोबर मयत झालेल्या सभासदांना २० हजार रुपये ना परतावा तत्वावर आर्थिक मदत म्हणून दिली जाणार आहे. त्याबाबतही सभासदांना अवगत




करण्यात येत आहे.

सदर सभेला उपस्थित सर्व सभासदांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. १०० कर्मचाऱ्यांनी एकत्र येऊन कर्मचारी चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पगारदार पतसंस्था १०/५/१९२९ रोजी स्थापन केली. या संस्थेची आता शतक महोत्सवी वर्षाकडे वाटचाल सुरू आहे. आर्थिक संकटाच्या वेळी कर्मचाऱ्यांना मदतीचा हात देण्याच्या उद्देशाने संस्थेची स्थापना झाली होती. आज या संस्थेची वार्षिक उलाढाल १४२ कोटीची असून सर्वोत्तम कार्यपद्धतीमुळे अ वर्गात समावेश झाला आहे. संपूर्ण राज्यातील केवळ शासकीय कर्मचारी हेच संस्थेचे सभासद होऊ शकतात. दि महाराष्ट्र मंत्रालय को.ऑप.क्रे.सो.लि. मुख्यालय आकाशवाणी आमदार निवास येथे असून सध्या कोकण भवन, कुर्ला, गोरेगाव, पालघर व मंत्रालय या ठिकाणी विस्तार खिडक्या कार्यरत आहेत. त्यांचे विस्तार शाखेमध्ये रुपांतर करण्याची मान्यता विशेष सर्वसाधारण सभेत घेण्यात आली आहे. कर्जाची उपलब्धता व अन्य सुविधा दिल्या जाणार आहेत. नवीन सभासद वाढवणे या हेतूने रायगड, रत्नागिरी, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, अहमदनगर आणि नागपूर अशा सात ठिकाणी विस्तार शाखा सुरू करण्याची योजना आहे. सध्याच्या या पाच आणि नव्याने कार्यान्वित होणाऱ्या सात अशा मिळून एकूण १२ शाखा संपूर्ण राज्यभर लवकरच सुरू होणार आहेत. सदर संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये या निर्णयाला मंजूरी दिली असून आता राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना तसेच सेवेतील सदस्यांना त्याचा फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. संस्थेचे सध्याचे नाव दि महाराष्ट्र मंत्रालय को.ऑप. क्रे.सो.लि. असे असून त्यात सध्या केवळ महाराष्ट्र शासनाचे कर्मचारी सदस्य होऊ शकतात. त्यामुळे खाजगी किंवा बिन सरकारी कर्मचाऱ्यांना सदस्य होण्याची तरतूद नाही. केवळ



शासनाच्या कर्मचाऱ्यांसाठीच ही संस्था असल्यामुळे नावात त्याचा उल्लेख करण्याचा निर्णय विशेष सर्वसाधारण सभेत घेण्यात आला आहे. त्यानुसार दि महाराष्ट्र मंत्रालय शासकीय कर्मचारी को. ऑप. क्रे. सो. लि. हे नाव करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सदर संस्थेच्या अध्यक्षपदी रमेश लव्हांडे असून उपाध्यक्ष भाऊसाहेब पठाण, मानद सचिव शशिकांत साखरकर, खजिनदार सुधीर कोळवणकर, सह मानद सचिव श्रीकांत काळे तसेच संचालकपदी राजेंद्र चव्हाण, शरद वनवे, मेघनाथ सुळे, अजित न्यायनिर्गुणे, गौतम कांबळे, सतीश जाधव, रवींद्र तिर्लोटकर, जितेंद्र पडेलकर, सरस्वती कदम, स्वाती वर्मा ही संचालक मंडळी शाखा विस्तार तसेच विविध योजनेच्या माध्यमातून संस्था तळागाळातील शासकीय कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचावी यासाठी अहोरात्र झटत आहे. संस्थेची प्रगती झपाट्याने होत आहे. त्यामुळे येत्या काळात प्रगतीचे चित्र सभासदांना समाधान मिळवून देईल. कर्मचाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना धीर देण्याचे तसेच संकटात आधार देण्याची भूमिका कायम राहील असा विश्वास अध्यक्ष रमेश लव्हांडे व सर्व संचालक मंडळाने विशेष सर्वसाधारण सभेत व्यक्त केला.

उपाध्यक्ष भाऊसाहेब पठाण हे चतुर्थश्रेणी महासंघ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष असून कर्मचाऱ्यांच्या प्रश्नाची त्यांना जान आहे. त्यांना कर्मचारी वर्गाच्या व्यथा समजत असल्यामुळे त्यांचा पाठीशी उभे राहून पतसंस्थेच्या माध्यमातून जेवढे काही चांगले करता येईल ते करण्याचा निर्धार यावेळी त्यांनी मनोगतात व्यक्त केला.

# शासनाच्या सरळसेवा भरतीसाठी वयोमर्यादेत दोन वर्षांची शिथिलता

**मुंबई :** शासन सेवेत सरळसेवेने भरती व्हावी, यासाठी कमाल वयोमर्यादेत ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत जाहिरातींसाठी दोन वर्षांची शिथिलता देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने हा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचे निवेदन पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री तथा सामान्य प्रशासन विभागाचे कामकाज सांभाळणारे मंत्री गुलाबराव पाटील यांनी विधानसभेत व मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत केले.

या निर्णयामुळे सरळसेवेने शासकीय सेवेत येऊ इच्छिणाऱ्या अ, ब, क, ड (वर्ग १ ते ४) या पदांसाठीच्या उमेदवारांना मोठा दिलासा मिळणार आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या यंदाच्या अमृतमहोत्सवी वर्षाच्या औचित्याने शासनाने ७५ हजार पदांची भरती प्रक्रिया सुरु केली आहे. ही भरती प्रक्रिया राबवित असताना लोकप्रतिनिधींकडूनही अनेक निवेदने प्राप्त झाली आहेत. या निवेदनांचा विचार करून आणि कोरोना विषाणू संकट अशा कारणांमुळे ज्यांची कमाल वयोमर्यादा संपुष्टात आली आहे. अशा उमेदवारांना परीक्षेत बसण्याची संधी प्राप्त करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत शासन सेवेत सरळसेवेने नियुक्ती देण्यासाठी प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींसाठी विहित केलेली वयोमर्यादा ओलांडणाऱ्या उमेदवारांसाठी वयोमर्यादेत दोन वर्षांची शिथिलता देण्यात येणार आहे. कमाल वयोमर्यादेत दोन वर्षांनी शिथिलता म्हणजेच जर खुल्या प्रवर्गासाठी विहित केलेली कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे असेल तरी ती ४० वर्षे ग्राह्य धरली जाईल. मागास प्रवर्गासाठी ४३ वर्षे असेल तर ती ४५ वर्षे ग्राह्य धरली जाईल.

ज्या उमेदवारांची कमाल वयोमर्यादा संपुष्टात आली आहे, अशा उमेदवारांना दिलासा मिळणार आहे. अनेक वर्षांपासून सरळसेवा पद्धतीने भरती व्हावी, यासाठी विद्यार्थी-उमेदवार तसेच संघटनादेखील प्रयत्नशील होत्या. त्यांच्या प्रयत्नांना यानिमित्ताने यश मिळत आहे. सरकारच्या वतीने घेतलेल्या या निर्णयाचे स्वागत होत आहे.

## महागाई भत्याची वाट बघत आहेत कर्मचारी

**नवी दिल्ली :** सरकारी कर्मचारी महागाई भत्याची वर्षातून दोनदा वाट बघत असतात. हा भत्ता कर्मचाऱ्यांच्या बेसिकमध्ये जोडला जातो. त्यामुळे बाकीचे सर्व भत्ते जे टक्केवारीच्या आधारावर मिळतात ते याच्या आधारावर मिळतात. जानेवारी महिन्याच्या महागाई भत्याचा सरकारी कर्मचारी वाट बघत आहे. होळीच्या अगोदर सरकार महागाई भत्याची घोषणा करेल, असं समजलं जात होतं. परंतु अद्यापही त्याची घोषणा झालेली नाही. कर्मचारी महागाई भत्याची वाट बघत आहेत.

दुसरीकडे सरकारने हे स्पष्ट केलंय की, कोरोना महामारीमध्ये केंद्रीय कर्मचाऱ्यांचा रोखलेला अठरा महिन्यांचा महागाई भत्ता किंवा डीए दिला जाणार नाही.

# गिरणी कामगारांच्या प्रश्नावर आक्रोश मोर्चा



केतन खेडेकर

**मुंबई :** राष्ट्रीय मिल मजदूर संघाच्या वतीने, मुंबईसह महाराष्ट्रात ज्या सहा एनटीसीच्या गिरण्या बंद आहेत. त्या कामगारांच्या तीन वर्षांपासून चाललेल्या उपासमारीवर आझाद मैदानावर कामगार आणि कुंटुबियांचे आक्रोश आंदोलन छेडण्यात आले.

विधानपरिषद विरोधी पक्षनेते असलेले अंबादास दानवे यांनी आंदोलनाला भेट दिली. प्रारंभी संघटनेचे अध्यक्ष आमदार सचिन अहिर यांनी प्रास्ताविक केले. आमदार शशिकांत शिंदे यांचेही भाषण झाले.

अंबादास दानवे यांनी सांगितले की, शासनाने वेळीच योग्य कार्यवाही करावी, अन्यथा विरोधी पक्षांचे सर्व आमदार सरकारला गिरण्या चालवायला भाग पाडतील.

अध्यक्ष सचिन अहिर म्हणाले की, कोविड काळापासून पूर्ण क्षमतेने चालणाऱ्या सहा गिरण्या बंद झाल्या. कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत पण वस्त्रोद्योग मंत्री पियुष गोयल यांच्या नाकर्तेपणामुळे ते मागे पडले. केंद्र सरकारला गिरण्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी काहीच करायचे नाही, पण आम्ही स्वस्थ बसणार नाही, न्याय मिळवून घेऊ, असा निर्धारही व्यक्त केली.

सरचिटणीस गोविंदराव मोहिते यांनी उपस्थितांचे स्वागत केले. गोविंदराव मोहिते यांनी कामगारांच्या प्रश्नांसाठी न्यायालयात औद्योगिक आणि उच्च न्यायालयात संघाच्या वतीने दावे दाखल करण्यात आल्याची माहिती दिली. कामगारांच्या प्रश्नावर राज्य सरकारने मध्यस्थी करावी, अशी आग्रही मागणीही त्यांनी केली.

संघटनेचे उपाध्यक्ष अण्णा शिर्सेकर, जयप्रकाश भिलारे, प्रवीण येरुलकर, उत्तम गिते, संजय कदम, संगीता राऊळ, वैशाली गिरकर, जया पाटील, वैशाली माने आदी मान्यवर कामगार प्रतिनिधींनी या आंदोलनात सहभाग घेतला.

## सार्वजनिक बांधकाम कर्मचाऱ्यांचे प्रलंबित मागण्यांबाबत आंदोलन

**मुंबई :** मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग व आमदार निवास कर्मचारी संघटनेच्या वतीने प्रलंबित मागण्यांबाबत आंदोलन अध्यक्ष विश्वास रणदिवे, कार्याध्यक्ष विजयकुमार कनोजिया, सचिव शशिकांत सकपाळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित आस्थापनेवर घ्या, कालेकर कर्मचाऱ्यांना कायम आस्थापनेवर घेण्यात यावे, तसेच सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये वर्ग ३ व ४ ची रिक्त पदे सरळ सेवेने तत्काळ भरावीत, १९८१ रोजीच्या शासन निर्णयानुसार वर्ग ४ संवर्गातील सेवानिवृत्त व त्याचबरोबर स्वेच्छानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या एका पाल्यास शासन सेवेत सामावून घ्या, अनुकंपा तत्वावरील भरती विना अट करावी, मुंबईतील आमदार निवास येथील आवश्यक आकृतीबंध पदे मजूर करावीत, तसेच १६ सप्टेंबर २००५ चा मानवी दिनांक ग्राह्य धरून जुनी पेन्शन योजना लागू करावी, या मागण्यांसाठी कर्मचारी संघटनेच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले होते.

## कंत्राटी कामगारांच्या हक्कांसाठी उपोषण!

**उल्हासनगर :** गेली सहा महिने कायद्याने वागा लोकचळवळ या संघटनेने उल्हासनगर पालिकेत कंत्राटी कामगारांच्या किमान वेतन कायदा लागू करण्याच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनाशी लढा देते आहे.

संघटनेचे अध्यक्ष राज असरोंडकर यांनी उपोषणाला सुरुवात केली. या उपोषणास राष्ट्रवादीचे नेते भारत गंगोत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते शिवाजी रगडे, मनसे शहराध्यक्ष बंडू देशमुख, प्रहार संघटनेचे स्वप्नील पाटील, समता प्रतिष्ठानचे विश्वासराव सदाफुले यांनी पाठिंबा दर्शवला आहे.

## शासनाच्या विविध विभागांच्या योजनांचा चित्ररथाद्वारे जागर

**धुळे :** राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनांची चित्ररथ, एलईडी रथाच्या माध्यमातून जनजागृती होऊन, लाभार्थ्यांची संख्या वाढण्यास मदत होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सचिव जलज शर्मा यांनी येथे केले.

विविध शासन विभागांच्या लोककल्याणकारी योजना धुळे जिल्ह्यातील चारही तालुक्यातील लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात यासाठी फिरता चित्ररथ तसेच एलईडी चित्ररथ तयार करण्यात आला आहे. या चित्ररथाला जिल्हाधिकारी शर्मा यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला.

अपर जिल्हाधिकारी देवदत्त केकाण, जिल्हा नियोजन अधिकारी ममता हटकर, जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके, समाज कल्याण विभागाचे अधिक्षक मुकेश कानडे, जिल्ह्याचे संबंधित माहिती कार्यालयाचे बंडू चौरे, चैतन्य मोरे, इस्माईल मणियार, भूषण सोनवणे, अरूण वंजारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी शर्मा म्हणाले या चित्ररथावर शासनाच्या विविध विभागांमार्फत राबविल्या जात असलेल्या ई-पीक पाहणी, प्रधानमंत्री पीक विमा योजना, हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग, आंतरराष्ट्रीय पौष्टीक तृणधान्य वर्ष, सखी वन स्टॉप सेंटर, महाराष्ट्र राज्यगीत, मुख्यमंत्री सहाय्यता वैद्यकीय निधी, माझी कन्या भाग्यश्री, सुहिता तुमच्यासाठी, महाआवास योजना, ७५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना एसटीमध्ये मोफत प्रवास आदिंसह सामाजिक न्याय विभागाच्या रमाई आवास योजना (घरकुल), गट ई कामगारांना पत्र्याचे स्टॉल, शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता व विद्यावेतन, सैनिक शाळेतील अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार, राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील युवकांसाठी सैन्य व पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना आदी योजनांची माहिती या फिरता एलईडी चित्ररथे व जिंगल्सद्वारे ग्रामीण भागात पोहोचवली जात आहे. जनजागृती केली जात आहे.

## भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय त्रैवार्षिक अधिवेशन

**पाटणा :** भारतीय मजदूर संघाच्या वतीने २० वे अखिल भारतीय मजदूर संघाचे त्रैवार्षिक अधिवेशन ७ ते ९ एप्रिल २०२३ यादरम्यान आयोजित करण्यात आले आहे.

अधिवेशन बिहारच्या पाटणा शहरातील केशव सरस्वती विद्यामंदिर, मिर्चा - मिर्ची रोड येथे होईल. यावेळी कामगार क्षेत्रातील मान्यवर नेते मार्गदर्शन करतील. शोषणमुक्त, समता-युक्त भारत असे त्याचे उद्दिष्ट असून भारतातील अनेक सदस्य यानिमित्ताने पाटणा शहरात उपस्थित राहणार आहेत. कामगारांच्या विविध प्रश्नांवर यानिमित्ताने चर्चा होणार आहे.

## आरोग्य सेविकांच्या वेतनात एक हजार रुपयांची वाढ

**मुंबई :** आरोग्य सेविकांच्या मानधनात १ हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. ही वाढ १ एप्रिलपासून होत असून त्यामुळे आरोग्य सेविकांना महिना १२ हजार रुपये इतके मानधन मिळणार आहे.

आरोग्य सेविकांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी गेल्यावर्षी मार्च महिन्यात आंदोलन केले होते. आरोग्य सेविकांना यावेळी समिती नेमून तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार ही वाढ करण्यात आली आहे.

## मिनी मंत्रालयात पुन्हा फाईलींचा खच

**गोंदिया :** दोन वर्षांपूर्वी अप्पर जिल्हाधिकारी राजेश खवले यांच्याकडे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार सोपविण्यात आला होता. त्यांनी प्रलंबित कामे मार्गी लावण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषदेत झिरो पेंडन्सी हा उपक्रम सुरू केला होता. त्याला योग्य प्रतिसादही मिळाला. मात्र, त्यांनी प्रभार सोडताच पुन्हा प्रत्येक विभागात आता फाईलींचे गठ्ठे साचल्याची चर्चा आहे.

जिल्हा परिषदेची ओळख मिनी मंत्रालय म्हणून आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण विकासात जिल्हा परिषदेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या नागरिकांसाठी, विविध योजनेच्या लाभार्थ्यांसाठी तसेच ग्राम विकासाच्या परिषदेमार्फत करण्यात येते.

विविध विभागांकडे अनेक योजना राबविण्याची जबाबदारी असतानादेखील कामाच्या फायली त्वरित निर्णय न होता बराच काळ पडून राहत होत्या. त्यामुळे विकासकामांना खीळ बसायची. अपर जिल्हाधिकारी राजेश खवले हे जिल्हा परिषदेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून रुजू झाले आणि त्यांनी गोंदिया जिल्हा परिषदेत झिरो पेंडन्सी उपक्रम प्रत्यक्षात राबवायला सुरूवात केली. जिल्हा परिषदेच्या कोणत्याही विभागात कोणतीही फाइल एका तासापेक्षा अधिक प्रलंबित राहायला नको, अशा सूचना खवले यांनी जिल्हा परिषदेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत. आता लवकरच या सर्वांचा निपटरा होईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## नोकरदार-माहेरवासिनींना लालपरीचा आधार

**मुंबई :** एसटीच्या गाडीने प्रवास करणाऱ्या महिला सध्या पर्यायी वाहनांचा वापर करतात. अनेक नोकरदार स्त्रिया दुचाकी अथवा चारचाकी घेऊन ये-जा करतात. काही वडाप, ऑटोरिक्षातून जातात, अनेकजण कुटुंबासोबत खाजगी वाहनाचा वापर करतात. त्या महिला आता एसटीकडून ५० टक्के सवलत मिळणार असल्याने लालपरीतून प्रवास करतील. त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाला भरघोस उत्पन्न मिळेल आणि अडचणीतील लालपरीची स्थिती सुधारेल, असा विश्वास महामंडळाला आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनुसंधान केंद्राचे विस्तारीकरण

**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आणि अनुसंधान केंद्र विस्तारीकरण प्रकल्पास निधी मंजूर झाला आहे. या दोन्ही प्रकल्पांसाठी आवश्यक जागेसंदर्भातील प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे याबाबत बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल, असे वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन यांनी विधानसभेत सांगितले.

उत्तर नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय आणि अनुसंधान केंद्राच्या विस्तारीकरण प्रकल्पाबाबतचा प्रश्न विरोधी पक्षनेते अजित पवार, विधानसभा सदस्य सर्वश्री विलास ठाकरे, नितीन राऊत यांनी उपस्थित केला होता.

मंत्री श्री.महाजन यांनी सांगितले की, हा प्रकल्प पूर्ण करण्यास असलेल्या जागेपैकी १५०० चौरस मीटर जागेवर न्यू ग्रँट एज्युकेशन संस्थेची इमारत असून या संस्थेच्या जागेचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. या प्रकल्पास आवश्यक जागेसंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींसमवेत प्रत्यक्ष पाहणी करून बैठक घेण्यात येईल. सध्या कार्यरत असलेल्या केंद्राच्या रुग्णालयात ६१५ बेडची क्षमता आहे. त्यासाठी यापूर्वी १,१६५ कोटी रुपयांचा निधी शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आला होता. उपलब्ध करून देण्यात आलेल्या निधीतून विशेष उपचार तसेच विशेष आरोग्य प्रशिक्षण केंद्रदेखील सुरु करण्यात आले आहे.

संशोधन केंद्राचा नवा विस्तार हा ७.५६ एकर इतक्या जागेवर करण्यात येणार आहे. तसेच कर्मचारी वर्गासाठीही काही जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. दरम्यान, यामुळे पूर्ण क्षमतेने हे केंद्र कार्यरत राहण्यास मदत होईल.

## लाड-पागे समितीचा शासननिर्णय सर्व शासकीय आस्थपानांना लागू

**मुंबई :** लाड-पागे समितीच्या शिफारशींचा उपयोग सफाई कामगारांच्या सामाजिक, अर्थिक व शैक्षणिक कल्याणासाठी करण्याचा शासन निर्णय नुकताच निर्गमित करण्यात आला आहे. मुंबई पालिकेसह राज्यातील सर्व महानगरपालिका व शासकीय आस्थापना यांचा शासन निर्णयामध्ये समावेश करण्यात आला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान परिषदेत दिली.

मुंबई महानगरपालिका सफाई कर्मचाऱ्यांना निवासाची आश्रय योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत भाजप आमदार भाई गिरकर यांनी प्रश्न उपस्थित केला होता. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, ॲड. निरंजन डावखरे, सुनील शिंदे, विलास पोतनीस यांनी चर्चेत सहभाग घेतला. त्याला उत्तर देताना फडणवीस म्हणाले, सफाई कामगार संघटनांनी आतापर्यंत जेवढ्या मागण्या केल्या, त्यांचा समावेश करून सर्वसमावेशक असा निर्णय घेण्यात आला आहे. शासनाच्या सर्व आस्थापनांना हा शासन निर्णय लागू आहे. त्यामुळे या सूचना पुन्हा देण्यात येतील.

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी यावेळी सांगितले की, सफाई कामगारांची अवस्था तसेच त्यांच्या कल्याणाची गरज विचारात घेऊन शासनाने या समितीची स्थापना केली होती. मुंबई महानगरपालिकेतील २९ हजार ६१८ सफाई कामगारांना सेवासदनिका उपलब्ध करून देण्याबाबत शासन संवेदनशील आहे. याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. ज्या शासनाच्या योजना सफाई कामगारांसाठी आहेत, त्या सर्व आस्थापनांनी प्रभावी अंमलबजावणी करावी तसेच त्या बाबतीत कुठल्याही प्रकारे हलगर्जीपणा करू नये, या भावनेने काम करण्याबाबतच्या सूचना देण्यात येतील.

## जातपडताळणीच्या रिक्त जागा भरणार

**मुंबई :** अनुसूचित जमाती प्रवर्गातून नेमणूक होऊन शासकीय अधिकारी, कर्मचारी अनेक वर्षे कार्यरत होते. मात्र जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने सर्वोच्च न्यायालय निर्णयानुसार त्यांना अधिसंख्य पदावर नेमण्यात आले आहे. अशा रिक्त झालेल्या पदांवर लवकरच भरती करण्यात येईल, असे आश्वासन मंत्री गुलाबराव पाटील यांनी विधान परिषदेत दिले.

अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी, कर्मचारी यांना अधिसंख्य पदाचा पदभार दिल्यासंबंधी सदस्य आमश्या पाडवी यांनी प्रश्न उपस्थित केला होता. अशा प्रमाणपत्र दाखल केल्याप्रकरणी या कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. मात्र २०-२५ वर्षे सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करणे सयुक्तिक नसल्याचे मत मंत्री गुलाबराव पाटील यांनी नोंदविले.

## बनावट सहीने मुख्यंत्र्यांना पत्र लिहल्याने विश्वास रणदिवे यांची पोलिसात तक्रार

**मुंबई :** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मुंबई सार्वजनिक बांधकाम विभाग व आमदार निवास कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष विश्वास रणदिवे यांच्या नावे बनावट सही करून दि महाराष्ट्र मंत्रालय को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. चे अध्यक्ष रमेश लव्हांडे आणि संचालक रवींद्र तिर्लोटकर यांच्याविरोधात तक्रार करण्यात आली. या बनावाबद्दल विश्वास रणदिवे यांनी वरिष्ठ पोलिस निरीक्षक, कुलाबा पोलिस ठाणे आणि मरिन ड्राईव्ह यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली असून हा प्रकार करणाऱ्यांचा तपास करून फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे.

ज्यांच्याविरोधात तक्रार केल्याचे हे पत्र आहे ते रमेश लव्हांडे आणि रवींद्र तिर्लोटकर माझे मित्र असून संघटनेतील सहकारी आहेत. अशा परिस्थितीत त्यांना तसेच मला प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे, असे नमूद करून विश्वास रणदिवे यांनी तक्रारीत पुढे म्हंटले आहे की, माझी सही स्कॅन करून अनेक ठिकाणी खोटानाटा पत्रव्यवहार देखील झाला आहे. हा अक्षम्य गुन्हा आहे. त्याचा कसून तपास होण्याची तसेच हे कटकारस्थान करणाऱ्यांचा शोध घेऊन चौकशी झाली पाहिजे.

या सर्व प्रकारामागे दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. चे मागील संचालक मंडळ कारणीभूत असावे, कारण त्यांचा पराभव एकता पॅनेलच्या उमेदवारांनी केला असून सर्वच्या सर्व निवडून आले असल्यामुळे ते हवालदिल झाले आहेत. वैफल्यग्रस्त होऊन ते हा खोडसाळपणा करत आहेत. त्यांचीही चौकशी यानिमित्ताने झाली पाहिजे, असेही विश्वास रणदिवे यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे.

## कंत्राटी नोकर भरतीचा शासन निर्णय रद्द करा!

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाचे अनुकरण देशातील अन्य राज्यांकडून होते. असे असताना आपल्या राज्यात कंत्राटी तत्वावर शासकीय कर्मचाऱ्यांची नोकरभरती करण्याचा निर्णय नुकताच राज्य शासनाने घेऊन तसा शासन निर्णय काढला आहे.

राज्यात ७५ हजार पदे भरण्याची घोषणा केली असताना दुसरीकडे मात्र शासन कंत्राटी नोकर भरतीचे परिपत्रक काढल्याने बेरोजगारांची थट्टा केल्यासारखे आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांची कोणतीही जबाबदारी नसते. त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवून कामे करुन घेणे अवघड जाते.

याकरिता सरळसेवा भरती करुन कंत्राटी नोकर भरतीचा शासन निर्णय रद्द करावा, त्याबाबतची कार्यवाही लवकर व्हावी, अशी मागणी महासंघाचे उपाध्यक्ष व जेष्ठ नेते सुरेश आहेरकर यांनी केली आहे.

## ...तर तलाठी करणार सामूहिक रजा आंदोलन

**यवतमाळ :** सन २०२१ मध्ये महागाव तहसीलमध्ये रेती जप्त करण्यात आली. जप्त केलेल्या रेतीचा लिलाव करण्याच्या सूचना होत्या. या रेतीचा लिलाव झाला; मात्र तो साठा तिथेच राहिला. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी तलाठ्यांवर निलंबनाची करावाई केली. यात तलाठ्यांची बाजू ऐकली गेली नाही, असा आरोप संघटना करीत आहे. ही कारवाई चुकीची आहे, असा आरोप करीत प्रश्न न सोडविल्यास सामूहिक रजा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

गौण खनिज प्रकरणात फुलसावंगी आणि टेंभीचे तलाठी यांचे मत जाणून न घेता त्यांच्यावर निलंबाची कारवाई झाली. हे निलंबन अन्यायकारक असल्याची भूमिका तलाठी यांचे मत जाणून न घेता त्यांच्यावर निलंबाची कारवाई झाली. हे निलंबन अन्यायकारक असल्याची भूमिका तलाठी संघटनांनी घेतली आहे. जोपर्यंत तलाठ्यांचे निलंबन मागे घेतले जात नाही, तोपर्यंत आंदोलन कायम ठेवण्याची भूमिका विदर्भ पटवारी संघ, नागपूर शाखेने घेतली आहे. या आंदोलनाला एक भाग म्हणून तलाठ्यांनी काम थांबविले आहे.

आंदोलनामुळे शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. हमी केंद्रावर नोंदणी करण्यासाठी पेराक्षेत्र गरजेचा आहे. तलाठ्याशिवाय हे पेराक्षेत्रही भरता येत नाही, यातून निर्धारित तारखेपर्यंत हरभरा विक्री करण्यासाठी हमी केंद्रावर नोंद करायची कशी, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी याची वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे तसेच चुकीची कारवाई झाली असेल ती त्वरित मागे घेतली पाहिजे, अशा अपेक्षा आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी हे सर्व समजून न्याय देतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# वांद्रे शासकीय वसाहतीतील घरांबाबत मुख्यमंत्र्यांकडून आढावा

## 'कर्मचारी टाइम्स' च्या वृत्ताची दखल

गुरुदत्त वाकदेकर

**मुंबई** : वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या मालकी हक्काच्या घराच्या मागणीबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान भवनात आढावा घेतला. याबाबतचे वृत्त **'कर्मचारी टाइम्स'** मध्ये प्रकाशित करण्यात आले होते. त्याची त्वरित दखल घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही कार्यवाही केली.



विधान भवनातील समिती कक्षात झालेल्या या आढावा बैठकीला सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, आमदार ॲड. अनिल परब, आमदार झिशान सिद्दीकी, माजी आमदार किरण पावसकर, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मनोज सौनिक, अपर मुख्य सचिव नितीन करीर, तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आयुक्त एसव्हीआर श्रीनिवास आदी वरिष्ठ अधिकारी आणि संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

वसाहतीतील रहिवाशांना मोफत घरे न देता इमारत बांधकाम खर्च आकारण्यात यावा. खचलेल्या व अति धोकादायक इमारतींचा पुनर्विकास प्राधान्याने व्हावा. १५ एकर जागा राखीव ठेवावी, अशा विविध मागण्यांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

## नव्या पेन्शनचा लाभ वारसांना देण्याचा निर्णय

**मुंबई** : राज्य शासकीय सेवेत २००५ वर्षानंतर रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांना नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना ही सवलत लागू आहे, तीच सवलत राज्यात लागू करण्याचे सरकारने ठरवले आहे. केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना अशावेळी सानुग्रह अनुदान किंवा पेन्शन यापैकी एकाची निवड करण्यास सांगितले जाते.




# एसटीचे १०० आगार अजूनही प्रभारी?

**मुंबई** : एसटीच्या राज्यभरातील २५० आगारांपैकी १०० आगारांमध्ये पूर्णवेळ आगार व्यवस्थापक नसल्याने 'प्रभारी' कडे काम चलाऊ कारभार देऊन, दिवस ढकलण्याचे उद्योग चालू असल्याचा आरोप एसटी कर्मचारी संघटनांकडून करण्यात येत आहे.

मधल्या काळात उत्पन्न वाढीसाठी बढती परीक्षा घेण्यात आल्या होत्या. त्याचा काही अंशी परिणाम होऊन उत्पन्न वाढ झाली आहे. आगार व्यवस्थापकांच्या परीक्षा होऊन ६ महिने लोटून गेले तरी देखील बदल्या आणि बढत्यांचा घोळ काही संपत नसल्याची माहिती संघटनांकडून देण्यात आली आहे.

संघटनांनी याबाबत दिलेल्या माहितीनुसार, सध्या एसटी महामंडळामध्ये एका महिला अधिकाऱ्याच्या आडमुठेपणामुळे गेली ६ महिने अधिकारी वर्गाच्या बदल्या व बढत्या रखडल्या असल्याचे बोलले जात आहे. बदल्या झालेले अधिकारी तब्बल महिना उलटला, तरी नवीन ठिकाणी रुजू व्हायला तयार नाहीत. या संदर्भात वरिष्ठांनी वेळोवेळी निर्देश देऊनदेखील संबंधित महिला अधिकारी फक्त वेळ दवडण्याचे काम करीत आहेत. याची दखल अध्यक्ष म्हणून मुख्यमंत्र्यांनी घ्यावी, अशी मागणी अधिकारी वर्गाने मुख्यमंत्र्यांकडे केली असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, परिवहन विभागाच्या वतीने एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूकदेखील शासकीय स्तरावरून त्वरित व्हावी, दिलेल्या निर्णयांची अंमलबजावणीदेखील व्हावी, अशी मागणीदेखील यानिमित्ताने करण्यात आली आहे.

## जे. जे. रुग्णालयात कर्मचाऱ्यांचा गौरव

**मुंबई** : ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सर ज. जी समूह रुग्णालय चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेच्या वतीने कोविड काळात उत्तम कार्य केलेल्या कर्मचाऱ्यांना सन्मानित करण्यात आले.

रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. पल्लवी सापळे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. गजानन चव्हाण, वैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण राठोड, डॉ. रेवंत, प्रशासकीय अधीक्षक दीपक लाड, विजय अंधारे, श्रीमती पोशिंदे, अनिल दळवी, संघटनेचे अध्यक्ष काशिनाथ राणे, सचिव यशवंत दळवी व संघटनेचे सर्व पदाधिकारी तसेच रुग्णालयातील सर्व संघटना कृती समिती, तृतीय श्रेणी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटना, रुग्णालयातील सर्व संघटनेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते कर्मचाऱ्यांना गौरविण्यात आले.

## अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या कलागुणांचे मृणाल कुलकर्णीकडून कौतुक

**मुंबई** : अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी हे आपल्या कामांसोबत इतर कला गुणांमध्ये प्रवीण आहेत, हे खरेच कौतुकास्पद आहे, असे गौरवोद्गार सुप्रसिद्ध अभिनेत्री मृणाल देव-कुलकर्णी यांनी काढले.

अन्न व औषध प्रशासन विभागातर्फे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन बक्षीस समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून त्या उपस्थित होत्या. त्यावेळी मृणाल कुलकर्णी बोलत होत्या.

अधिकारी व कर्मचारी यांच्यात सुप्त गुण असतात परंतु कामाच्या व्यापात त्यांना त्याची जाणीव नसते, तसेच इतरांसमोर ते येत नाही, अशावेळी स्नेहसंमेलन हे एक माध्यम आहे, तिथे त्याची प्रचिती येते, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी आयुक्त अभिमन्यू काळे, सहआयुक्त चंद्रकांत थोरात, भूषण पाटील, शैलेश आढाव, दुष्यंत भामरे, शशिकांत केकरे, दयानंद अवशंक यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. अन्न व औषध प्रशासन विभागाच्या वतीने थ्रो बॉल, क्रिकेट, बुद्धिबळ, गोळाफेक, कॅरमसह संगीत खुर्ची आणि अंताक्षरी यासारखे खेळ आयोजित केले होते. या खेळांमधील विजेत्यांना यावेळी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आले. यावेळी गुणवंत पाल्यांचे सत्कारदेखील करण्यात आले. राज्यभरातील अधिकारी व कर्मचारी या स्पर्धांमध्ये सहभागी झाले होते. अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री संजय राठोड यांच्या प्रेरणेने, सचिव डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनात आणि आयुक्त काळे यांच्या संकल्पनेतून हे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले होते.

## अर्ध्या तिकीटावर महिलांना एसटी प्रवास

**मुंबई** : एसटी महामंडळाच्या, सर्व बसमधून महिलांना अर्ध्या तिकिटावर राज्यात कोठेही प्रवास करता येणार आहे. योजनेमुळे सवलतीची प्रतिपूर्ती रक्कम महामंडळाला मिळेल. त्यातून उत्पन्नात वाढ होऊन लालपरीला नवसंजीवनी मिळणार आहे.

एसटी महामंडळातर्फे समाजातील विविध ३० घटकांना प्रवास भाड्यात ३३ ते १०० टक्क्यांपर्यंत सवलत दिली जाते. आता राज्य सरकारने स्वातंत्र्यदिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त राज्यातील ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना एसटीतून मोफत प्रवासाची सुविधा दिली आहे. या योजनेचा लाभ आतापर्यंत सुमारे ६ कोटी ज्येष्ठ प्रवाशांनी घेतला आहे. आता सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केल्यानुसार परिपत्रक निघाल्यानंतर महिलांना सवलत लागू झाली आहे.

## मंत्रालयातील लिपिक-टंकलेखक कर्मचाऱ्यांना वाढीव ग्रेडपे कधी?



**मुंबई** : राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतन व भत्ते अदा करण्याकरिता के. पी. बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली समितीने केलेल्या शिफारशीनुसार (खंड-१) शासकीय कार्यालयातील लिपिक - टंकलेखक कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर (एस. ८) म्हणजेच सहाव्या वेतन आयोगानुसार रु. २४००/- लागू न झाल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

याबाबत मंत्रालय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष रविंद्र मंजुळे यांनी सांगितले की, सदर मागणीसाठी मंत्रालय कर्मचारी संघटनेकडून वारंवार पाठपुरावा करूनदेखील कुठलाच निर्णय झाला नाही.

शिफारशीच्या अनुषंगाने सचिव स्तरावर अभ्यास करून तीन महिन्यात निर्णय घेणे अपेक्षित होते. पण अद्याप कार्यवाही झालेली नाही. यामागे प्रशासन उदासीन असल्याचे जाणवते. संघटना लिपिक तसेच टंकलेखक कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनस्तर मंजूर करून घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. तरी शासनाने वेळीच निर्णय घेऊन कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा अन्यथा आंदोलन करण्यावाचून आमच्यापुढे पर्याय राहणार नाही, असा इशाराही रविंद्र मंजुळे यांनी दिला आहे.

## कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वाढ करण्यासाठी विनंती

**मुंबई** : राज्यात कर्मचारी योजना १९९५ (ईपीएस - ९५) ही केंद्र शासनाची स्वयंनिधी योजना आहे. राज्य शासनाकडून कोणतीही कार्यवाही केली जात नाही. मात्र, या योजनेत कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती-वेतनात वाढ करण्याबाबत केंद्र शासनाला विनंती करण्यात येईल, अशी माहिती कामगारमंत्री सुरेश खाडे यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासाला निरंजन डावखरे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना दिली.

मंत्री डॉ. खाडे पुढे म्हणाले की, ईपीएस-९५ ही योजना १००टक्के केंद्र शासन पुरस्कृत योजना आहे. राज्य शासन समन्वयक म्हणून कार्यरत आहे.

## आचार्य बाळशास्त्री जांभेकर सन्मान योजनेतील जाचक अटी रद्द करा

### मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे साकडे

**मुंबई** : महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकारांना लागू करण्यात आलेल्या आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजनेतील जाचक अटींमुळे अनेकजण या योजनेपासून वंचित राहिले आहेत, या जाचक अटी रद्द करण्यात याव्यात, अशी मागणी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वि.प. उपसभापती डॉ. निलाम गोऱ्हे यांच्याकडे शिष्टमंडळ नेऊन तसेच स्वतंत्र निवेदने देऊन केली आहे.

मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात उपाध्यक्ष महेश पवार, कार्यवाह प्रवीण पुरो, कोषाध्यक्ष विनोद यादव, कार्यकारिणी सदस्य अलोक देशपांडे, कमलाकर वाणी, खंडुराज गायकवाड, मनोज मोघे, भगवान परब यांचा समावेश होता.

ज्येष्ठ पत्रकारांसाठी ही योजना लागू केली गेली. मात्र, निकष जाचक असल्याने अनेक ज्येष्ठ पत्रकारांना त्यापासून वंचित रहावे लागत आहे. हे बदल झाल्यास त्याचा लाभ या ज्येष्ठ पत्रकारांना मिळू शकेल, असे निवेदनात नमूद केले आहे.

## समतादूतांचे उपोषण

**मुंबई** : समतादूत प्रकल्पातील मनुष्यबळाचे समाज कल्याण विभागात समायोजन व्हावे या प्रमुख मागणीसाठी राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाची स्वायत्त संस्था असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे अंतर्गत समाजदूतांनी आझाद मैदानावर उपोषण केले. प्रकल्प अधिकारी व समतादूतांचे जालिंदर जगताप यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन केले. अमोल म्हात्रे, कल्पना बेलसरे आणि प्रणीता दासर यांच्यासह ९० समतादूत यांनी यात सहभाग घेतला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी आमच्या मागणीचा तत्काळ निर्णय घ्यावा, अशी त्यांची मागणी आहे.

## 'कर्मचारी टाइम्स'च्या व्यवस्थापकीय संचालक मंडळाची बैठक

# शासकीय कर्मचाऱ्यांविषयीचे वृत्तपत्र ऐतिहासिक ठरेल : ग. दि. कुलथे

**मुंबई** : सरकारी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या माध्यमातून सुरु करण्यात आलेल्या **'कर्मचारी टाइम्स'**च्या व्यवस्थापकीय संचालक मंडळाची पहिली बैठक सम्राट हॉटेल, चर्चगेट येथे झाली. अध्यक्षस्थानावरून बोलताना राजपत्रित अधिकारी संघटनेचे नेते ग. दि. कुलथे यांनी अशाप्रकारचा शासकीय कर्मचाऱ्यांविषयी वृत्तपत्राचा पहिलाच प्रयोग महाराष्ट्रात होत असल्यामुळे **'कर्मचारी टाइम्स'** ऐतिहासिक ठरेल, असा विश्वास व्यक्त करत शुभेच्छा दिल्या.



संपादक भाऊसाहेब पठाण यांनी मनोगतात सांगितले की, शासनाच्या सेवेत असलेल्या सर्व वर्गातील शासकीय कर्मचारी वर्गाचे हे वृत्तपत्र आहे. आपले स्वतःचे मुखपत्र पाहिजे, असे आपले नेते कै. र. ग. कर्णिक नेहमी सांगत असत, त्यांचेच स्वप्न **'कर्मचारी टाइम्स'**च्या रुपाने साकार होत आहे. आता आपल्याला एकत्र येऊन हे वृत्तपत्र चालवायचे आहे तसेच टिकवायचे देखील आहे.

उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. मासिकाचे पाक्षिक व साप्ताहिकात रुपांतर व्हावे, कर्मचाऱ्यांनी आपले पाठबळ द्यावे, अशा स्वरुपाच्या सूचना मान्यवरांनी मनोगतात व्यक्त केल्या.

खेळीमेळीच्या वातावरणात झालेल्या या बैठकीस संपादक भाऊसाहेब पठाण यांच्यासह सुरेश आहेरकर, मंगल नाखवा, अशोक शिंदे, रमेश लव्हांडे, रविंद्र मंजुळे, बाबाराम कदम, बाळाराम सावर्डेकर, सुधीर कोळवणकर, शरद पाटील, शशिकांत साखरकर, विश्वास रणदिवे, पराग आडीवरेकर, नंदकुमार साने, मनोहर दिवेकर, सतिश सोनवणे, गुरुदत्त वाकदेकर, रिद्धी कुबल, छाया करे आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक कार्यकारी संपादक अशोक शिंदे यांनी तर उपसंपादक सुरेश आहेरकर यांनी सूत्रसंचालन केले.

# कंत्राटदार बदलले तरी कामगार बदलू नये

## उपआयुक्त संतोष भोसले यांच्या सूचना

**मुंबई** : कामगार उपायुक्त संतोष भोसले यांनी महावितरण, महापारेषण व महानिर्मिती वीज कंपनी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. यात प्रामुख्याने कंत्राटदार बदलले तरी कामगार तेच जुने व अनुभवी राहतील याची काळजी प्रशासनाने घ्यावी जेणे करून कुशल व अनुभवी कामगार रोजगारापासून वंचित राहणार नाहीत. तसेच कामगाराच्या अपराधाची शहानिशा होऊन अधिकाऱ्यांनी सांगितल्याशिवाय कंत्राटदाराने कामगाराला परस्पर कामावरुन कमी करू नये, अशा सूचना दिल्या.

महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपनीतील मंजूर रिक्त विविध पदावर काम करत असलेल्या अनुभवी वीज कंत्राटी कामगारांना कंत्राटदार एजन्सी कडून होत असलेल्या आर्थिक जाच व रोजगार विषयक कामगार उपायुक्त संतोष भोसले यांनी मुंबई कार्यालयाच तिन्ही कंपनीची व संघटना प्रतिनिधी यांची बैठक बोलवली होती.

या बैठकीसाठी कामगार उपायुक्त संतोष भोसले, सुहास कदम प्रशासनच्या वतीने महावितरणचे संजय ढोके, महापारेषणचे भरत पाटील व महानिर्मितीचे श्रीमती रुपाली वळुंज व संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगाळे, संघटनमंत्री उमेश आनेराव, उपाध्यक्ष सचिन भावसार व मोहन देशमुख उपस्थित होते.

## शिक्षक वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कार्यवाही

**मुंबई** : राज्यातील प्राथमिक, पदवीधर विषय शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे मंत्री गिरिश महाजन यांनी विधानपरिषदेत सांगितले. याबाबत सदस्य कपिल पाटील यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी ते उत्तर देत होते.

समान काम, समान वेतन या विषयाबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल आहे. त्याशिवाय शिक्षण आयुक्त यांच्या स्तरावर समितीदेखील नेमण्यात आली आहे. या समितीचा अहवाल आणि न्यायालयाचा निर्णय आल्यानंतर योग्य ती कार्यवाही करेल, असेही श्री. महाजन यांनी सांगितले. विधानपरिषद सदस्य अभिजित वंजारी, मनीषा कायंदे यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

# महिला कर्मचाऱ्यांचा लोकल प्रवास दिवसेंदिवस होतोय अधिकच त्रासदायक....

**डोंबिवली** : घर चालविण्या-साठी तसेच करिअरच्या दृष्टीने महिला नोकरी व्यवसाय करत आहेत. रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून महिलांसाठी रेल्वेकडून मिळणाऱ्या सोयी-सुविधांमध्ये वाढ झालेली नाही. महिला प्रवाशांसाठी आजही लोकलमध्ये केवळ तीन डबे आहेत. रेल्वेतील प्रवास सुरक्षित नाही. उपनगरीय रेल्वे प्रवासी महासंघ, तेजस्विनी महिला प्रवासी संघटना यासाठी लढा देत असल्या तरी अद्यापही कुठलीच कार्यवाही झालेली नाही.

काही रेल्वेस्थानकात महिलांसाठी स्वच्छ शौचालयांची सोय केलेली दिसत नाही. कधी-कधी तर शौचालये चक्क कुलूपबंद अवस्थेत दिसून येतात. अशा वेळी महिलांची फारच कुचंबणा होत असते. अशा अनेक समस्या महिला प्रवासी सहन करत आहेत. त्यासाठी महिला प्रवासी संघटनेच्या वतीने आंदोलने करण्यात आली. पुरोगामी महाराष्ट्रातील व भारताची आर्थिक राजधानी म्हणून जगभरात ओळख असलेल्या मुंबई शहरातील उपनगरीय रेल्वे प्रवासी महिलांना आजही त्यांच्या समान हक्क व अधिकारापासून वंचित रहावे लागत आहे.

प्रवासी महिला संघटनेच्या अध्यक्षा लता अरगडे यांनी याबाबत मागण्यांचे एक निवेदन प्रशासनाला सादर केले आहे. मात्र त्यांना अद्यापही काही प्रतिसाद आला नाही.

त्यांच्या निवेदनातील मागण्या अशा - १. उपनगरीय रेल्वेच्या वाढत जाणाऱ्या गर्दीचे विभाजन करण्यासाठी कार्यालयीन वेळेत बदल करणे, २. महिला प्रवाशांसाठी बोगीची संख्या वाढवणे, ३. एसी ट्रेन, फर्स्ट क्लास डब्यातील अनधिकृत प्रवासी रोखण्यासाठी सर्व स्थानकांवर टीसीची नेमणूक करणे, ४. सर्व उपनगरीय स्टेशन परिसरातील तसेच पूलांवरील अनधिकृतपणे बसणाऱ्या फेरीवाल्यांना तत्काळ उठवणे, ५. उपनगरीय गाड्यांमधील महिलांच्या डब्यातून विक्री करणाऱ्या पुरुष फेरीवाल्यांना बंदी घालणे, ६. रेल्वे परिसरात लहान बालकांना भीक मागायला तसेच सामान विक्री करायला लावणाऱ्या पालकांवर कायदेशीर कारवाई करणे.

## महत्वाचे शासन निर्णय (जीआर)

| विभाग व जीआर क्रमांक | तपशील व दिनांक |
| --- | --- |
| **महसूल व वन विभाग** २०२३०१०३११३०५७६०१९ | सलोखा योजनेंतर्गत मुद्रांक शुल्क व नोंदणी फी माफी देणेबाबत. (०३-०१-२०२३) |
| **सार्वजनिक आरोग्य विभाग** २०२३०१०४१७२२१५९२१७ | आकस्मिक आजारांमध्ये म्युकरमायकोसीस या नवीन आजाराचा समावेश करणेबाबत. (०५-०१-२०२३) |
| **पाणीपुरवठा व स्वच्छता** २०२३०१०६१३१९२९३७२८ | ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांसाठी जमीन/जागा उपलब्ध करण्याबाबत. (०६-०१-२०२३) |
| **कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यवसाय विभाग** २०२३०१०९१२१४४५१६०१ | आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष, २०२३ च्या निमित्ताने मकर संक्रांती-भोगी हा सणाचा दिवस पौष्टिक तृणधान्य दिन म्हणून साजरा करण्याबाबत. (०६-०१-२०२३) |
| **वित्त विभाग** २०२३०१११५१२२९१३०५ | असुधारित वेतनश्रेणीत (सहाव्या वेतन आयोगानुसार) निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन घेणाऱ्या निवृत्तीवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना दि. १ जुलै, २०२२ पासून २१२ टक्के महागाई वाढ देण्याबाबत. (११-०१-२०२३) |
| **महिला व बाल विकास विभाग** २०२३०११२१३४२५३३०३० (१२-०१-२०२३) | राज्यातील संकटग्रस्त महिलांना तातडीने आवश्यक माहिती व सहाय्य मिळण्यासाठी १८१ या क्रमांकाची टोल फ्री १८१ महिला हेल्पलाईन स्वतंत्रपणे सुरु करण्याबाबत. |
| **सामान्य प्रशासन विभाग** २०२३०२०११९००१०८४०७ | स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या औचित्यावर महाराष्ट्राचे राज्यगीत स्वीकृत करण्याबाबत. (०१-०२-२०२३) |
| **शालेय शिक्षण व क्रीडा विभाग** २०२३०२१४१८०२०८७१२१ | राज्यात कॉपीमुक्त अभियानाची अंमलबजावणी करण्याबाबत. (१४-०२-२०२३) |
| **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग** २०२३०२२४१८३८५६०७२२ | लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत सुधारीत तरतुदी. (२४-०२-२०२३) |
| **वित्त विभाग** २०२३०३०९१४२१५०३५०५ | विकलांग अपत्य असलेल्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना विशेष बालसंगोपन रजा मंजूर करण्याबाबत. (०९-०३-२०२३) |

## संपादकीय

# पेन्शनबद्दल यापुढे वेळकाढूपणा नको

महाराष्ट्र राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांनी जुन्या निवृत्तीवेतन योजनेसाठी सुरु केलेल्या आंदोलनाचे लोण मोठ्या प्रमाणावर पसरले आहे. कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने रणांगणात उतरला. ठिकठिकाणी निषेध, निदर्शने, आंदोलने झाली. महामोर्चेदेखील जिल्हा-जिल्ह्यांमध्ये निघाले. त्यातूनच या जुन्या पेन्शनसाठी हा कर्मचारी वर्ग किती संवेदनशील आहे, हे ध्यानात आले. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असताना हे आंदोलन सुरु झाले आणि त्याचे पडसाद विधिमंडळातदेखील उमटले. त्यामुळे साहजिकच शासनाला निर्णय घेणे भाग पडले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्रिसदस्यीय समिती नेमून त्यांच्या अहवालानंतर निर्णय घेण्याचे जाहीर केले. वास्तविक हा निर्णय कर्मचाऱ्यांना अपेक्षित नव्हता. वास्तविक त्यांनी जुन्या पेन्शन योजनेला तत्वत: मान्यता देऊन ती लागू करण्याबाबत समिती अथवा अभ्यास गट तयार केला असता तर नक्कीच कर्मचारी वर्ग सुखावला असता अशा प्रतिक्रिया सर्वत्र व्यक्त होऊ लागल्या. त्यामुळे अखेर शासनाने राज्य कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांचे समन्वयक विश्वास काटकर आणि राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण आदी मान्यवरांबरोबर वाढता दबाव बघून तातडीची बैठक घेतली. बैठकीत जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत तत्वत: मंजूरी दिली असून त्याबाबत तीन महिन्यात समितीचा अहवाल आल्यानंतर ती लागू करण्याचे निश्चित केले. त्यामुळे राज्यभर सुरु असलेल्या संप मागे घेण्यात आल्याची घोषणा विश्वास काटकर यांनी या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना केली. कर्मचारी वर्गाच्या मागणीचा सकारात्मक विचार होत आहे, ही बाब नक्कीच समाधानाची आहे. मात्र, तीन महिन्यांच्या कालावधीचा वेळ वाढवून घेणे, त्यानंतरही ही योजना लागू करण्याबाबत शिफारशी आल्या तर त्या किती कालावधीनंतर स्विकारणार, हा देखील प्रश्न आहे. त्यामुळे शासकीय कर्मचारी वर्ग काही प्रमाणात प्रतिकूल प्रतिक्रिया देताना दिसत आहे. जुन्या पेन्शनचा प्रश्न कचाट्यात सापडला आहे, पण आता इतके दिवस थांबल्यानंतर शासनाला तीन महिन्यांचा अवधी देण्यात काहीच हरकत नसावी. अन्यथा त्यानंतर मार्ग आहेच की, हे कर्मचारी वर्गाने ध्यानात घेतले पाहिजे. शासनालाही या आंदोलनाची झलक दिसली आहे. यापुढील काळात तर ही आंदोलनाची धग अधिकच असेल. आंदोलनात सरकारी, निमसरकारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी संघटना आहे. त्यामुळे त्याची व्याप्ती मोठी आहे. जुन्या पेन्शन योजनेच्या मागणीबाबत कर्मचाऱ्यांची काही भूमिका आहे आणि सरकारचेही काही धोरण आहे. मात्र चर्चेच्या माध्यमातून त्यातून तोडगा निघू शकतो. आर्थिक शिस्तीचा धाक दाखवून कर्मचाऱ्यांना न्याय्य हक्कापासून त्यांना वंचित ठेवण्याचा सरकारचा हेतू असल्याचा संशयास्पद वाटत होता. पण मुख्यमंत्र्यांबरोबर सकारात्मक चर्चा झाल्यानंतर नक्कीच ते न्याय देतील, अशी आशा आहे. या दरम्यानच्या काळात असेही दिसून आले की, सरकारी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत सत्ताधारी आमदारदेखील संवेदनशील नसून त्यांनी त्या मुद्यावरून हिणवण्याचे प्रयत्नदेखील केले आहे. त्यामुळे साहजिकच हा कर्मचारी वर्ग दुखावला गेला आहे. सरकारी कर्मचाऱ्यांची भरती होत नसल्यामुळे उपलब्ध मनुष्यबळावर फार मोठा ताण आहे. शासकीय कामकाजात अत्यंत डोळसपणे आणि काळजीपूर्वक कर्तव्य निभावावे लागते. सरकारी कर्मचारी हा राज्याच्या विकासातील आणि प्रगतीमधला महत्वाचा घटक आहे. त्यांना निवृत्तीनंतर सुखाने आणि स्वाभिमानाने जगता यावे, ही जबाबदारी सरकारची असून जुनी पेन्शन हाच त्याच्यावरील उपाय आहे. जुन्या पेन्शन योजनेवरून सरकारी कर्मचारी वर्गाला हिणवण्याचा प्रयत्न अनेकजण करत आहेत, समाजमाध्यमांमध्येही चुकीची प्रतिमा उभी केली जात आहे, त्यांनीदेखील वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे. काही संघटना या समिती स्थापन करण्याच्या शासनाच्या निर्णयाला अनुकूलता दाखवत आंदोलनातून बाहेर पडल्या आहेत. तसे त्यांनी करायला नको होते. कारण एकी असेल तर प्रश्न लवकर आणि प्रभावीपणे सुटत असतात. त्यामुळेच सर्व संघटनांनी एकत्रित येऊन या प्रश्नावर लढा देण्याची गरज आहे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या संपाच्या विरोधात काही विधिज्ञ हे न्यायालयात गेले आहेत. त्यांनीदेखील त्यांच्या भूमिकेविषयी पुनर्विचार करण्याची गरज आहे. शासकीय कर्मचारी वर्गाचे हित आणि त्यांची मानसिकता विचारात घेतली पाहिजे. उलट त्यांनी कर्मचारी वर्गालाच सहकार्य केले पाहिजे, पाठबळ दिले पाहिजे. २००५ नंतर जुनी पेन्शन योजना बंद केली. मात्र, त्यानंतर रुजू झालेले शासकीय कर्मचारी आता निवृत्तीच्या मार्गाकडे झुकले आहेत. लवकरच ते निवृत्त होतील, त्यावेळी त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना अर्थिक समस्यांना सामोरे जावे लागणर आहे. एवढा दीर्घकाळ शासकीय सेवा करूनदेखील त्यांना आयुष्याच्या उत्तरकाळात अवहेलना सहन करावी लागणार आहे. त्यामुळे ही योजना सत्ताधाऱ्यांनी नाकारू नये तर ती लागू करण्याच्या दृष्टीने अधिक आणि सकारात्मक पावले उचलली पाहिजेत.जुनी पेन्शन योजना ज्यावेळी रद्द करण्यात आली, त्यावेळी हा निर्णय काही सुखावणारा नव्हता. केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाला लागू करणे राज्य शासनाची भूमिका असते. त्यामुळे त्याचा परिणाम महाराष्ट्रातील कर्मचारी वर्गावर झाला परंतु आता केंद्र सरकारनेही याबाबतच्या देशभरातील राज्य सरकारी कर्मचारी वर्गाच्या भावना विचारात घेतल्या पाहिजेत. राज्या-राज्यांमध्ये आंदोलने सुरु झाली आहेत. त्याची झळ केंद्र सरकारपर्यंत पोहचू शकते. तसे झाले तर देशात अराजकता माजण्यासारखी परिस्थिती येईल. त्यामुळेच केंद्र सरकारनेही आता लवकरात लवकर जुनी पेन्शन योजना त्यांच्या कर्मचारी वर्गासाठी लागू करावी म्हणजे राज्य सरकारनाही त्यांचे अनुकरण करत ही योजना लागू करणे शक्य होईल. याबाबत राजकीय मंडळींनीही कुठलेही राजकारण यात आणू नये. नुकत्याच झालेल्या पदवीधर मतदारसंघातील निवडणूकीत झलक बघायला मिळाली. त्यामुळे जो कोणी जुनी पेन्शन लागू करेल, त्यालाच शासकीय कर्मचारी साथ देईल. यापूर्वी इतर राज्यांमध्ये सत्तेवर आलेल्यांना त्याचा अनुभव आला आहे. त्यामुळेच त्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यावाचून पर्याय नव्हता. हेही राजकीय मंडळींनी ध्यानात ठेवून सर्वच पक्षांनी सकारात्मक रहावे, उद्योग अशी सर्व कर्मचाऱ्यांची भावना आहे.

# कामगारांचे बाबासाहेब आणि बाबासाहेबांचा कामगार वर्ग

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १४ एप्रिल हा जयंती दिन. नैतिक सामाजिक मूल्याच्या ऱ्हासाने इथल्या कामगारांचे अवमूल्यन होऊ लागले आहे. त्यांनी केलेले कामगारांविषयीचे कायदे आज अंमलात आणण्याची गरज निर्माण झाली असून तीच खरी महामानवाला मानवंदना ठरणार आहे.**



आपण सारेच आणि संपूर्ण जग बाबासाहेबांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणून ओळखतो. माणसाला माणूस म्हणून जगायला शिकवणाऱ्या ताठ मानेने जगण्याचे हक्क देणाऱ्या राज्यघटनेसाठीचे बाबासाहेबांचे योगदान हे भरीव असेच आहे, पण त्या सोबतच पद दीनदलित पिडीतांना न्याय मिळवून देताना इथल्या पिडीत कामगारांनाही त्याच तळमळीने बाबासाहेबांनी न्याय मिळवून देण्याचे कार्य केले.

या कामगारांसाठी त्यांनी आभाळाएवढं महान कार्य करून कामगारांच्या वेदनेला वाचा फोडून त्या दु:खाची सल कायमची नष्ट करण्याचे अटाकोट प्रयत्न केले.

शेतमजूंराना किमान मजुरी देणे, औद्योगिक कामगारांना पुरेसा पगार व पगारी सुरक्षा, तसेच कामगार संघटनेला मान्यता मिळवून देणे, वर्षातून कमीतकमी २४० दिवस काम करणाऱ्या कामगारांना कायम करवून घेणे. कामगारांना दिवसभर केवळ आठ तासांचे काम,नोकरीत असताना जर कामगारांचा अपघात अथवा मृत्यू झाला तर मालकांकडून कामगाराला नुकसान भरपाई ही अशी कल्याणकारी धोरणं आखली तसेच त्यांचा त्यांनी पाठपुरावाही केला.

१९३८ च्या मनमाड येथील दलित वर्ग कर्मचारी परिषदेत ब्राम्हणशाही आणि भांडवलशाही हे भारतीय कामगारांचे दोन शत्रू आहेत असे आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगताना बाबासाहेबांनी १७ मार्च १९३८ या दिवशी मुंबईच्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या सर्वसाधारण सभेत गरीबांचा पक्ष गरीबांनी चालविला पाहिजे हा दूर्दम्य आशावाद कामगारांच्या मनात जागवला. सामाजिक अन्याय, अत्याचार विरोधात तसेच आर्थिक विषमतेविरूध्द कामगारांनी लढले पाहिजे, तेव्हाच कामगार संघटनेच्या बळावर प्रश्न सुटतील अशी आत्मलढा देण्याची प्रेरणा कामगारांना देतानाच परावलंबी असण्यापेक्षा स्वावंलबी व्हा, असा प्रेरक संदेश दिला. कामगार हा फक्त चार अक्षरी शब्द नसून तो शब्द खूप व्यापक आहे. यात जात, धर्म, वंश, लिंग हे सर्व वर्ग म्हणजेच मजूर. म्हणूनच या कामगाराला (मजूराला) डोळ्यासमोर ठेऊन त्याच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी १५ ऑगस्ट १९३६ ला स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. त्यावेळी पक्षाच्या नावातच मजूर हा शब्द ठेवला.

कामगारांचे धोरण ठरविताना नुसता वरवरचा विचार न करता कामगारांच्या पुढील आयुष्याला कामाला एक ठोस स्वरूप देण्याचं काम करीत असतानाच अनेक बारीक सारीक बाबींचा बाबासाहेबांनी किती बारकाईने विचार केला होता, याची प्रचिती त्यांच्या पुढील धोरणांतून दिसून येते. युनियनच्या बाबतीत धोरण ठरवत असताना मालकाने कामगारांच्या युनियनला मान्यता दिली पाहिजे, आणि जर मालक मान्यता देत नसेल तर अशा कारखानदारांवर दंडनीय गुन्हा दाखल केला जावा. अशा प्रकारचे विधेयक मांडून कामगार हित कामगारांच्या एकजुटीचे युनियनचे हित पाहून तशा प्रकारचा कायदा करण्यास तत्कालिन सरकारला भाग पाडले. आज कामगार क्षेत्रासाठी विविध ठिकाणी ज्या युनियन लढत आहेत, संघर्ष करत आहेत, तसेच कामगारांच्या एकजुटीने आणि युनियनच्या माध्यमातून कामगारांच्या आजच्या प्रश्नांना वाचा फोडत आहे, अशा सर्व युनियनला मान्यता देण्याचे महत्त्वपूर्ण काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

मजूरांसाठी कामाचे तास, आरेग्यविषयक सुविधांसाठी विमा, भविष्यनिर्वाह निधी, मालकाची जबाबदारी, नुकसान भरपाई, महागाई भत्यात वाढ यांसारख्या महत्त्वपूर्ण बाबी कामगार हितासाठी कायद्यात आणल्या. भारताच्या स्वातंत्र्य प्राप्तीनंतर बाबासाहेब कायदे मंत्री झाले. तेव्हा कामगार व मालक यांच्यातील वाद शांततेने सोडवता यावा यासाठी १९४७ मध्ये औद्योगिक कलह कायदा आणून मालक व कामगार यांचे अत्यंत विकोपाला जाणारे वाद शांततेच्या मार्गाने सोडवण्याची एक महत्त्वपूर्ण दिशा कामगार वर्गाला बाबासाहेबांनी दिली.

औद्योगिक क्षेत्रातील कलह कायद्यासारखे अनेक महत्त्वपूर्ण कायदे बाबासाहेबांनी कामगार कल्याणासाठी अंमलात आणले.

कामगारांच्या हिताची धोरणे आखताना बाबासाहेबांनी स्त्री कामगारांच्या हिताचे अतिशय महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन कामगार स्त्रियांना हक्काचा लखलखता सूर्य बाबासाहेबांनी दाखवला. मजूर मंत्री असताना खाणीमध्ये काम करणाऱ्या स्त्री कामगारांना बाळंतपणसारख्या काळात चार आठवड्याचा प्रसूती भत्ता मिळवण्याचा हक्क दिला. तसेच प्रसूतीनंतर चार आठवडे विश्रांती व भत्ता मिळण्याचा हक्क स्त्रियांना दिला.

आज महिलांना प्रसूतीसाठी पगारी सुट्या मिळतात, तसेच पुरूषांसोबत काम करणाऱ्या महिलेला तेवढाच समान पगार मिळतो, ही कामगारासंबधी राबवलेल्या धोरणांची, अंमलात आणलेल्या कायद्यांची, प्रश्नांच्या

**अनुज केसरकर**

सोडवणूकीच्या तळमळीची बाबासाहेबांची दूरदृष्टी होती.

बाबासाहेबांनी राज्यघटना लिहिल्याचे आपण जाणतोच. पण संविधानात कामगारांसाठीच्या समान संधी आणि समानतेचा विचार त्यांनी मांडला.

१९४८ साली कारखाना कायद्यान्वये तसेच त्यावर्षी किमान वेतन हा कामगारांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा कायदा अंमलात आणून शासनाने ठरवून दिलेलेच किमान वेतन मिळाले पाहिजे. त्यापेक्षा कमी वेतन न देण्याचे निर्बंध कारखान्यावर, संघटनेवर घालण्यात आले. त्याच वर्षी कामगारांच्या जीवनात सुरक्षितता यावी तसेच काम करताना अपघात झाला किंवा अंपगत्व आले तर त्यावर उपाय म्हणून कर्मचारी राज्य विमा कायदा आणून व यांसारख्या अनेक कायद्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीने त्यांनी इथल्या कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या योग्यतेनुसार, कामानुसार आणि गुणवत्तेनुसार मोबदला मिळाला पाहिजे. तसेच भांडवलदार आणि श्रीमंत यांना भेदभावाची वर्तणूक करण्यापासून परावृत्त करण्याचे अतिशय अवघड काम घटनेत करून ठेवले असून इथल्या कष्टकरी, मजूर, शोषित, पिडीत समाजाच्या उद्धारासाठी त्यांनी राज्यघटनेत कायदेही केले आहेत. आजच्या कामगारांचे योग्य वेतन, विविध रजा. सार्वजनिक तसेच आजारपण सुट्या, विमा, भविष्यनिर्वाह निधी आणि असं भरीवकाम, इथल्या कामगारासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर नावाच्या युगपुरूष करून ठेवले आहे.

आजच्या कामगारांना सोयी सुविधा बाबासाहेबांमुळे मिळाल्या आहेत हे आपल्या सारख्या प्रत्येकाने हे लक्षात घेऊन बाबासाहेबांना डोक्यावर नाही तर डोक्यात घेण्याची ठाम गरज आजच्या घडीला निर्माण झाली आहे. पायदळी तुडवल्या जाणाऱ्या शोषित, वंचित तसेच पिडीतांना डॉ. बाबासाहेबांनी हक्काचा मार्ग दाखवला. त्याच बरोबर कामगारांसाठी घटनेत महत्त्वपूर्ण अशा तरतुदी केल्या.

डॉ. बाबासाहेबांसारखे युगप्रवर्तक या भारतदेशात, महाराष्ट्रात जन्माला आले हे आपले भाग्य. बाबासाहेबांसारखी माणसे जन्माला येतात व अशा व्यक्ती आपल्या येण्याने इथल्या समाजाचे संतुलन राखण्यासाठी कार्य करत असतात. स्वत:च्या बहुआयामी व्यक्तिमत्वाने प्रत्येक गोष्टीत, प्रत्येक ठिकाणी स्वत:चं असं भरीव कार्य करून या व्यक्ती नंतर निघून जातात. आपण कपाळकरंटे त्यांच्या जयंत्या, पुण्यतिथ्या साजरे करत बसतो. मग बाबासाहेबांपासूनच असे कित्येक बाबासाहेब वंचित राहतात. राज्यघटना लिहिणाऱ्या बाबासाहेबांनी कामगारांसाठी ठोस यंत्रणा राबवली. त्यामुळेच इथल्या कामगारांच्या उन्नतीचा मार्ग सुकर झाला.

इथल्या दलित, पिडित शोषित समाजाला, अंधारातल्या माणसांना उजेडात आणताना त्यांना ज्ञानाचा, जगण्याचा अधिकार देतानाच कामगारांचे जीवनमान सुधारण्याचे काम बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. कामगारांच्या कुटुंबियां-विषयी बाबासाहेबांना चिंता होती. स्त्री कामगारांबद्दल आत्मीयता होती, कामगारांच्या प्रश्नाचे बाबासाहेब जाणकार होते, फक्त जाणकार नसून अनुभवकारही होते आणि त्याच कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक करणारे शिल्पकारही बाबासाहेब ठरले.

आज कामगारांची स्थिती वाईट आहे. जागतिकीकरण झाले, संगणक युगाच्या उदयाने कामगारांची गरज कमी झाल्याचे दिसत आहे. यांत्रिकीकरणाच्या विळख्यात इथल्या कामगारांचं भरडणं सुरूच आहे. बहुराष्टीय कंपन्याच्या वारेमाप उदयाने इथल्या कामगारांच्या कामाचा दाम कमी आणि भांडवलदाराला नफा जास्त असे चित्र दिसून येत आहे. तसेच एकाधिकारशाही, भांडवलशाही, साम्राज्यवाद, सांस्कृतिक दहशतवाद अधिक फोफावल्याने इथे पुन्हा आहे रे आणि नाही रे या वर्गातली दरी वाढू लागली आहे.

नैतिक सामाजिक मूल्याच्या ऱ्हासाने इथल्या कामगारांचे झपाटयाने अवमूल्यन होत आहे. या साऱ्या परिस्थितीत आज एकजूटीने सर्वांनी बाबासाहेबांचा धोरणीपणा समजून घेतला पाहिजे. बाबासाहेबांनी केलेले कायदे अंमलात आणण्याची गरज निर्माण झाली असून तीच खरी महामानवाला मानवंदना ठरणार आहे.

# खाजगीकरणाचे धोके

खाजगीकरण हा गुलामीचा फास आहे जो हळूहळू तुमचा गळा दाबेल! खाजगीकरण प्रथम सरकारी कार्यालय - उद्योगधंदे यांची बदनामी करते. BSNL चे उदाहरण आठवा. रेंज नाही, कॉल कट होणे, इत्यादी. नंतर खाजगीचे समर्थक सरकारद्वारेच सरकारी उद्योग बंद पाडतात. नंतर तेच उद्योग कवडीमोलाने विकत घेतात व 'दुनिया मुठ्ठी में' म्हणून धंदा करतात. आता रेंज कट झाला वा जास्त बील आले तरी कुठे चर्चा नाही ! डावपेड लक्षात घ्या !!

आता डोळा शिक्षणावर आहे. तुम्ही आम्ही झेड पी - अथवा महानगरपालिकांच्या शाळांमध्ये शिकलो. तुटपुंजी का असेना पण स्कॉलरशिप मिळायची, फी माफी अन्य सर्व बंद होत आहे. सरकारने शाळा काढणे बंद केले आहे. खाजगी उद्योगपतींनी येऊन शाळा - कॉलेज - विद्यापीठे काढावीत, असे सरकार म्हणते. भरपूर फी असेल जी तुम्हाला परवडणारी नाही. तसेच फी माफी नाही, स्कॉलरशिप नाही. मग तुम्ही कसे शिकणार? सरकारी दवाखान्याचेही तसेच! पूर्वी सरकारी दवाखान्यांत मोफत उपचार - औषधे भेटत असत. आता तिथेही औषेधे बाहेरून आणा, एक्सरे बाहेरून, टेस्ट बाहेरून करून घ्या, असे चालू आहे. त्यावर सरकारचे नियत्रंण नाही. सरकार खाजगी दवाखाने काढण्यास प्रोत्साहन देत आहे. तेथील महाग दर तुम्हाला परवडणारे नाहीत. मग तुम्ही आजारी पडलात व खिशात पैसे नसले तर काय करणार ?

सरकारी खात्यात भ्रष्टाचार आहे म्हणून खाजगीकरण चांगले, असे काही जण म्हणतात. त्यांचा असा गैरसमज असतो की, खाजगी क्षेत्रांत भष्टाचार होत नाही, परंतु खाजगी क्षेत्रात सरकारी खात्यापेक्षा १०० पट जास्त भ्रष्टाचार असतो. फक्त त्याच्याशी नागरिकांचा संबंध येत नाही, म्हणून त्यांना तो कळत नाही व बाहेर आमच्याच कंपनीचे औषध, गोळ्या, इंजेक्शन लिहून द्या असे सांगून फर्मास्युटिकल कंपन्या एम.आर. मार्फत डॉक्टरांना काय काय प्रलोभने देतात तो उघड उघड भ्रष्टाचार नाही का? याचाच परिणाम म्हणून जे औषध तुम्हाला १० रुपयात मिळायला हवे ते २५० रुपयांत मिळते.

खाजगी क्षेत्रांतील टेंडर्स, कच्चा माल आणणे, नेमणूका करणे यांत भरपूर देवाणघेवाण होते! सामान्य नागरिकांना कळत नाही. म्हणून खाजगी क्षेत्र भ्रष्टाचार मुक्त आहे. असे त्यांना वाटते.

तो काळ दूर नाही जेव्हा इतिहास शिकवला जाईल जो भारताची शेवटची सरकारी शाळा, सरकारी ट्रेन, शेवटची सरकारी बस, शेवटचा सरकारी विमानतळ आणि शेवटचा सार्वजनिक उद्योग होता.

सरकारी उपक्रमाचे किंवा




सरकारी संस्थांचे खाजगीकरण झाल्यास सामान्य जनतेच्या मौनाचा एक दिवस संपूर्ण देशाला महागात पडेल. सर्व शाळा, सर्व रूग्णालये, रेल्वे, विमानतळ, वीज, पाणी, सर्व खाजगी हातात असेल, तेव्हा देश कंगाल झालेला असेल !

लक्षात ठेवा की, कमीत कमी खर्चात जास्त लोकांपर्यंत पोहोचणे हे सरकार आणि सरकारी उपक्रमांचे उद्दिष्ट आहे. तर खाजगी संस्थांचे उद्दिष्ट कमी खर्चात जास्तीत जास्त नफा मिळवणे हे आहे.

खाजगीकरण षडयंत्रावर देशातील जनतेने मौन बाळगणे म्हणजे आपल्या गुलामीचा फास बळवट करणे !

त्यामुळे तुम्ही जागे व्हा आणि तुमचा देश आणि तुमच्या देशाची सार्वजनिक संपत्ती वाचवा. रेल्वे वाचवावी लागेल. सरकारी रूग्णालये आणि शैक्षणिक संस्था वाचवाव्या लागतील, सरकारी रूग्णालये आणि शैक्षणिक संस्था वाचवाव्या लागतील. सरकारी असलेली एमएसईबी कंपनी, बीएसएनएल, टपाल कार्यालये एलआयसी, वाचवावी लागतील, सरकारी कर्मचारी आणि सरकारी उद्योगही वाचवावे लागतील.

अडचणीच्या वेळी फक्त सरकारी विभागच कामाला येतात, कोणताही खाजगी विभाग काम करत नाही. ज्याचे उदाहरण तुम्ही अलीकडेच पाहिले किती खाजगी रूग्णालये कोविड रूग्णांवर मोफत किंवा किमान दराने उपचार करत होती ? किती खाजगी बस मजूर, कामगार, विदयार्थ्यांना घेऊन जात होत्या. खाजगी संस्था आणि स्वयंसेवी संस्था जमिनवर उतरून जनतेला मदत करत होत्या का ? कोविड काळात देखील कोणत्याही खाजगी विमान कंपन्या भारतातून एअरलिफ्ट करत नव्हत्या! परंतु अतिशय बिकट परिस्थितीत सर्व शासकीय अधिकारी / कर्मचारी रस्त्यावर उतरून काम करत होते. खाजगीकरणाचे पूर्णपणे समर्थन चुकीचे आहे. अन्यथा येणाऱ्या काळात फक्त काही उद्योगपतीच हा देश चालवतील आणि पूर्वीसारखी गुलामी भारतामध्ये पुन्हा येईल. अशा वेळी सत्ता आणि संपत्ती या मौल्यवान गोष्टी काही मूठभर लोकांच्या हातात असतील!

लक्षात घ्या, राजकीय शक्ती हा फक्त एक देखावा असतो. तो किती व कशाप्रकारे सजवायचा हे उद्योगपतीच ठरवतात. म्हणून यापुढील काळात राजकीय बांधिलकी खाजगीकरणाचे सर्मथन थांबवा. खाजगीकरणाचा धोका ओळखता आला पाहिजे. त्यात सर्वसामान्य जनता भरडली जाते. त्यांचे अधिक शोषण होते. त्यामुळे याबाबत वेळीच दक्ष राहिले पाहिजे. खासगीकरण निश्चितच फायदेशीर नाही. खासगीकरणाला विरोध केला पाहिजे. भारत माझा देश आहे, तो वाचविण्यासाठी प्रत्येकाने पुढे आलेच पाहिजे !

**साभार : राजसारथी**

## वाचकपत्र

### भटक्या कुत्र्यांची कर्मचाऱ्यांमध्ये दहशत !

नोकरीनिमित्ताने पुणे-मुंबई तसेच पुणेलगत प्रवास करणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत आहे. पुण्याहून लगतच्या जिल्ह्यात कर्मचाऱ्यांना भल्या पहाटे घर सोडावे लागते, तसेच घरी येण्यास रात्री उशीरही होतो. अशावेळी दिवस असो वा रात्र या भटक्या कुत्र्यांचा त्रास अशा चाकरमान्यांना सहन करावा लागतो. रस्त्यावर चालणाऱ्यांचा चावा घेणे, पाठलाग करणे, गुरगुरणे आदी तक्रारी वारंवार येत असतात. वसाहतींच्या बाहेर असलेल्या कचराकुंडी च्या जागा या भटक्या कुत्र्यांचे साम्राज्य असते. पुण्यातील भवानी पेठ, हरका नगर, काशीवाडी, जुना मोटर स्टँड आदी भागांमध्ये अशा भटक्या कुत्र्यांचा मोठा सुळसुळाट झाला आहे. बऱ्याच ठिकाणी लहान मुलांवर कुत्र्यांनी हल्ला केल्यामुळे पालक आपल्या मुलांना एकटे कुठे सोडण्यास धजावत नाहीत. पहाटे घर सोडणाऱ्या व रात्री उशीरा कामावरुन येणाऱ्या कर्मचाऱ्यांना या भटक्या कुत्र्यांचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. संबंधितांनी लक्ष घालून ही समस्या सोडवावी.

**- रजनीश कांबळे,**
नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई.

# आमदार आणि मंत्र्यांच्या पेन्शनचा ५ अब्ज बोजा?

शासनाच्या तिजोरीत असलेला खडखडाट, त्याचे विकासकामावर होणारे परिणाम आणि राज्य कर्जाच्या खाईत लोटलेले असताना ३५७ आमदारांच्या फक्त पगारावर पाच वर्षांत ४ अब्ज ९५ लाख ७२ हजार रुपयांचा बोजा तिजोरीवर पडत असल्याची माहिती चव्हाट्यावर आली आहे. फक्त एका जिल्ह्याचे उदाहरण घेतले तर सातारा जिल्ह्यातील २४ आमदारांच्या पेन्शनसाठी महिन्याला १ कोटी १३ लाख ३८ हजार तर वर्षाला सुमारे १३ कोटी ६० लाख ५६ हजार रुपयांचा बोजा शासनाच्या तिजोरीवर पडत असून यामध्ये वाढीव पेन्शनची नजीकच्या काळात भर पडेल. जिल्ह्याची आकडेवारी पाहता राज्यातील माजी आमदारांच्या पेन्शनचे कोटीतले उड्डाण पाहून डोळे पांढरे होण्याची वेळ आली आहे. दर पाच वर्षाने पराभूत आमदारांच्या संख्येत वाढ होत असल्याने हा बोजा दिवसेंदिवस वाढतच जात आहे. शासनाच्या तिजोरीला परवडत नाही, म्हणून शासकीय नोकरांची पेन्शन योजनाच गुंडाळणाऱ्या राज्यकर्त्यांनी जनसेवेच्या गोंडस नावाखाली स्वत:चे उखळ पांढरे करण्यात धन्यता मानल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

कोरोनाने सर्वसामान्यांना चारीमुंड्या चीत केले असताना पहिल्या लॉकडाऊनमध्ये अधिवेशनाच्या शेवटच्या क्षणात आमदारांचे चालकासाठी पंधरा हजाराचा मलिदा तर दुसऱ्या लॉकडाऊन काळात माजी आमदारांच्या पेन्शन वाढीचा ठराव एकमुखी झाल्याची चर्चा सुरु आहे. आयुष्यातील ३० ते ४० वर्षे शासकीय नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांला २२ ते २५ हजारांची पेन्शन तर पाच वर्षे आमदार म्हणून जनसेवा करणाऱ्या कार्यसम्राटांना ५० हजार रुपये पेन्शन मिळत आहे. या व्यतिरिक्त आमदारांना, वैद्यकीय बिले, साडेतीन हजार कि.मी. मोफत रेल्वे प्रवास तर एसटीचा अमर्याद मोफत प्रवास अशा सुविधा दिल्या जात असल्याने जनसेवेच्या नावाखाली म्हणा, आमदार खातोय की मेवा, असे म्हणायची वेळ सर्व-सामान्यांवर आली आहे.

आमदारांच्या पगारावर पाच वर्षांत सुमारे ४ अब्ज ९५ लाख ७२ हजार रुपयांचा तिजोरीवर बोजा पडत आहे. ही आकडेवारी दिवसेंदिवस बाळसे धरत आहे. प्रत्येक आमदाराचा पगार सुमारे १.७५ लाखांच्या घरात आहे. आजच्या डिजिटलच्या युगात विशेष म्हणजे टपाल सेवा आणि दूरध्वनी सेवेसाठी त्यांना हजारो रुपयांची खिरापत वाटली जात आहे.

राज्यात विधानसभा आणि विधानपरिषदेच्या आमदारांची संख्या ३६७ च्या घरात आहे. या आमदारांचा पगार महिन्याला पावणे दोन लाखांहून अधिक असल्याची माहिती यानिमित्ताने समोर आली आहे.

महाराष्ट्र विधानमंडळाने जानेवारी २०१८ या वर्षातील खर्चाची आकडेवारी मती गुंग करणारी आहे. सर्वसामान्य माणूस औद्योगिक वसाहतीत संसाराचा गाढा ओढण्यासाठी ६ ते ७ हजारांवर राबतो. मात्र आमदारांचे मूळ वेतन ६७ हजार रुपये, महागाई भत्ता ९१ हजार १२० रुपये, संगणक चालक सेवा १० हजार रुपये, दूरध्वनी सेवा ८ हजार रुपये, टपाल सुविधा १० हजार रुपये यांचा समावेश असून आमदारांना एकूण १ लाख ८६ हजार १२० रुपये प्रत्येक आमदारांवर दरमहा खर्च होत आहे. ३६७ आमदारांच्या वेतनापोटी दरमहा ६८ कोटी ३० लाख ६ हजार रुपयांचा बोजा शासकीय तिजोरीवर पडत आहे.

शासनाच्या तिजोरीवर खडखडाट असल्याचा डांगोरा पिटला जात आहे. अशा परिस्थितीत स्वत:चे पगार आणि पेन्शन या सुविधांसाठी सत्ताधारी आणि विरोधक या प्रश्नावर गळ्यात गळे घालत असल्याचे वास्तव समोर आले आहे.

आमदारांना ठराविक अंतर मोफत रेल्वे, विमान प्रवास, खासगी रुग्णालयातील वैद्यकीय खर्च ही सुविधा माजी आमदारांना देखील लागू करण्यात आली आहे. शासनाला परवडत नसल्याने शासकीय नोकरांची पेन्शन दिली जात आहे. आमदार जेवढ्या टर्म निवडून येतील, त्या प्रत्येक टर्मसाठी पाच हजारांची वाढ पेन्शनमध्ये केली जात आहे. दर पाच वर्षाने काही नवीन आमदार निवडून येतात, त्यांना पगार सुरु होतो. ते पेन्शनच्या यादीत आपोआप येतात. त्यामुळे दर पाच वर्षाने आमदारांची पेन्शन यादी वाढत जात आहे.

सातारा जिल्ह्यात २४ माजी आमदार पेन्शनचा लाभ घेत आहेत. सातारा जिल्हयाची गत अर्थिक वर्षातील आकडेवारी थक्क करणारी आहे. या आमदारांच्या पेन्शनमध्ये कोरोना काळात झालेल्या अधिवेशनात पुन्हा वाढ झाल्याची माहिती चर्चेत आहे.

एवढ्यावर हे जननायक थांबले नाहीत, तर आमदार साहेबांच्या गाडीवरील चालकांना १५ हजार रुपयांची पगाराची मंजुरी मिळाल्याची चर्चा आहे. अधिवेशनात आंदोलन छेडणारे विरोधक फायद्याच्या वेळी मूग गिळून गप्प आहेत. या खर्चावर कुठे तरी आळा घातला जावा, अशी जोरदार चर्चा जनमानसात जोर धरू लागली आहे.

**- शरद काटकर,**
**सातारा**
(९८२३९६३३७७)

# कामगारांच्या नसातील नाळ ओळखून प्रश्न हिरिरीने मांडणारा, विलक्षण समाजसेवेने झपाटलेला कार्यकर्ता



**भारत वानखडे**

नावातच भारत आणि कर्तृत्वात अखंड भारत या कर्तृत्वत्वान नायकाचे नाव म्हणजे भारत वानखडे. ३० वर्षांपासून मी मंत्रालय पत्रकारिता करीत आहे पण भारत वानखडे आहे तिथेच आहे. यातच त्यांचा मोठेपणा आहे. हुजरेगिरी त्यांच्या रक्तात नाही. म्हणूनच मंत्रालयात त्यांना असामान्य व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाते.

घरची अर्थिक परिस्थिती नाजूक, पोटाची खळगी भरण्या-करिता, शिक्षण घेण्याकरिता सुरू असलेला संघर्ष स्वत:च्या शिक्षणासाठी पहाटे ४ वाजता उठून वर्तमानपत्रे वाटणे, वकिलाच्या कार्यालयाची साफसफाई करणे, वेगवेगळ्या हॉटेलमध्ये वेटरचे काम करणे व इतरही छोटी मोठी काम करुन समाजकार्यासोबतच शिक्षण घेणे नंतर नोकरी मिळवून मंत्रालयाच अधिकारी पदापर्यंत मजल मारणे, या सोबतच महाराष्ट्रातील मागासवर्गीय अधिकारी कर्मचारी यांचे कर्मचारी वर्गाच्या न्याय हक्कासाठी कायद्याच्या चौकटीत राहून अडचणीत आलेल्या अन्यायग्रस्तांना लोकशाही मार्गाने न्याय मिळवून त्यांच्या जीवनात प्रकाश टाकणारे ध्येयवादी नेतृत्व म्हणून भारत वानखडे यांचा उल्लेख करावा लागेल.

मागील वर्षी त्यांचा उत्साहात वाढदिवस साजरा झाला. विदर्भासारख्या भागात चिंचोली रुद्रायणी या बार्शीटाकळी तालुक्यात भारत वानखडे यांचा जन्म झाला. ५०० ते ६०० वस्तीच्या छोट्याशा गावात त्यांचे वडील वामनराव किसनराव वानखडे आखाड्याचे मल्लखांब वस्ताद होते. त्यांचे शिक्षण ३ री तर आई सुमनबाईचे शिक्षण ७ वी पर्यंत झाले होते. आई-वाडिलांच्या डोक्यावर आंबेडकरी विचारांचा आणि चळवळीचा मोठ्या प्रमाणावर पगडा राहिला. परमपूज्य बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणे आपल्या मुलांनी खूप शिकून आपल्या समाजाची सेवा करावी, अशी त्यांची खूप इच्छा होती.

आपले आईवडिलांचे स्वप्न भारत वानखडे आणि त्यांच्या भावडांनी सत्यात उतरविले. भारतसर त्यांचे मोठे बंधू प्रशासकीय सेवेत आहेत. औरंगाबाद म्हटले की, आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला दिपाली, मोतीलाल हॉटेलमध्ये वेटरच काम करत असताना त्यांनी आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्याचे संघटन उभे केले.

मराठवाड्याच्या झंझावातात त्यांनी चळवळीमध्ये स्वत:ला झोकून दिले. स्पर्धा परीक्षेत बँक, नेव्ही, मंत्रालय या तिन्ही परीक्षेत ते उत्तीर्ण झाले. १३ जुलै १९९२ साली मंत्रालयातील वित्त विभागात प्रथम रोख शाखेत लिपिक पदावर ते रूजू झाले.

**नोंद**

भारत वानखडे मंत्रालयाच्या मॅको बँकेत संचालक आहेत. ते उपाध्यक्ष पदी विराजमान झाले होते. आज २५० ते ३०० कोटीची उलाढाल असणाऱ्या मॅको बँकेत ते सभासदांना सहकार्य करत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मशताब्दी निमित्ताने २००६ साली बौध्द दिक्षा सुवर्ण महोत्सव समिती स्थापना केली. राज्यभर १५ कार्यक्रम घेतले. उदित राज आणि प्रा इंदिरा आठवले यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याच्या अखिल भारतीय अनूसूचित जाती, जमाती कामगार संघटनांचा परिसंघ नवी दिल्ली या संघटनेच्या माध्यमातून मुंबई महासचिव या भूमिकेतून त्यांनी सोबत असलेल्या कामगारांचे अनेक प्रश्न सोडविले. नंतर याचे प्रभावी काम होत नसल्याने दलित मित्र शंकर खुने आणि स्वत:ची अनूसूचित/जाती/जमाती/विजा-भज/इमाव/विमा/प्रशासकीय/निमशासकीय अधिकारी कर्मचारी संघटना सन २००५ साली स्थापन केली. आज या संघटनेच्या माध्यमातून भारत वानखडे यांच्या माध्यमातून अनेक प्रश्न सोडविले जातात. मंत्रालयातून मध्यवर्ती ग्रंथालय गेल्या दोन वर्षांपासून बंद आहे माजी मंत्री नितीन राऊत व माजी ऊर्जा मंत्री अदिती तटकरे यांचेकडे भारत वानखेडे याची मागणी केल्यामुळे भव्यदिव्य ग्रथांलय उभे राहणार आहे. सनदी अधिकारी यांच्यासह भारत वानखडेचा हुकमी वचक ते निर्भिड असल्यामुळे त्यांची कामे होतात. त्यांच्याबद्दल लिहावे तेवढे कमी आहे. अशा या महान कामगार नेत्याला माझ्याकडून हार्दिक शुभेच्छा. त्यांच्या या प्रेरणादायक अशा कार्याची मंत्रालयाच निश्चितीच नोंद राहील.

**नासिकेत तरूलता कृष्णाकांत पानसरे**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त, महाराष्ट्र शासन**
**९९३०९९८९७८**

# जुन्या पेन्शन योजनेच्या निमित्ताने....

**जुन्या पेन्शन योजनेला लागू करण्यात यावे, यासाठी 'कर्मचारी टाइम्सने' सातत्याने सकारात्मक भूमिका घेतली आहे. मात्र या पेन्शन योजनेबाबत समाजातील दुसरा मतप्रवाहदेखील व्यक्त होतोयं. त्यांचे म्हणणे जाणून घेतले तर निश्चित या योजनेला लागू होण्याबाबतचे अडथळे दूर होऊ शकतील, त्यामुळेच या विषयावरील विश्लेषणात्मक लेख वाचकांसाठी देत आहोत. — संपादक**

जुनी पेन्शन योजना हे सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आमिष असू शकते. कदाचित तसे नसेलही किंवा असेलही. गरिबांची संपत्ती काढून घेऊन ती श्रीमंतांमध्ये वाटण्याचे हे एक उदाहरण आहे. या विरोधातील उदाहरण म्हणून जुन्या पेन्शन योजनेचे समर्थक अलिकडेच केलेल्या कॉर्पोरेट करकपातीचा उल्लेख करू शकतात. तथापि, करकपातीमध्ये गुंतवणुकीला चालना देण्याचे किमान तत्त्व आहे. ते आणखी मोठे कर संकलन आणि रोजगार निर्माण करते. अर्थात हे प्रत्यक्षात घडते की नाही हा वेगळा मुद्दा आहे.

निवृत्त कर्मचाऱ्यांच्या श्रीमंत वर्गाला अधिक पेन्शन दिल्याने आर्थिक व्यवहारांना चालना मिळेल, असा तर्क करता येईल का? महत्त्वाचे म्हणजे, कोणत्याही वर्गाला रोख रक्कम हस्तांतरित केल्यास तिचा वापर वाढेल. मग, सरकारने आयुष्मान भारतासारखी योजना थांबवली आणि त्यातून मिळालेल्या पैशाचा वापर देशातील काही श्रीमंत लोकांना रोख रक्कम देण्यासाठी केला तर आपल्याला चालेल का? लोकांच्या दृष्टीने, जुनी पेन्शन प्रणाली ही एक 'वापराल तेवढेच पैसे द्या' या प्रकारची योजना आहे. या योजनेतून सध्या सरकारच्या सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून निवृत्त कर्मचाऱ्यांचे पेन्शनदायित्व भागवले जाते.

याउलट, २००३ मध्ये एनडीए सरकारने स्थापन केलेली नवीन किंवा राष्ट्रीय पेन्शन प्रणाली ही एक नीट योजना असून त्यात कर्मचारी त्यांच्या वेतनातील काही भाग गुंतवतात आणि सरकारही त्यात काही गुंतवणूक करते. जुन्या पेन्शन योजनेमध्ये, कर्मचाऱ्यांना त्यांच्या शेवटच्या पगाराच्या ५० टक्के समतुल्य रकमेची हमी दिली जाते. या दोन्ही धोरणांमध्ये किती भिन्न आर्थिक परिणाम होतात याची कल्पना करणे अवघड नाही. वाढते आयुर्मान पाहता, जुनी पेन्शन योजना टिकाऊ बनवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे अधिकाधिक सरकारी कर्मचारी असणे, पण त्यामुळे तिच्यात संबंधित अकार्यक्षमता वाढते किंवा उत्तरोत्तर अधिक कर्ज घेणे.

यातून काय होईल ते स्पष्ट आहे. पेन्शनच्या ओझ्याखाली राज्यांची अर्थिक स्थिती ठप्प होईल. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने राज्यांच्या वित्तविषयक नुकत्याच प्रसिध्द केलेल्या अहवालात (१९ नोव्हेंबर २२) राज्यांच्या निवृत्तिवेतनावरील खर्चाचा तपशील देण्यात आला आहे. राजस्थान जुन्या पेन्शन योजनेत सगळ्यात आधी गेले, आज त्याचा पेन्शनवरील खर्च तब्बल २८ टक्के आहे. याउलट, महाराष्ट्रात हीच टक्केवारी १४ टक्के आहे, तर गुजरातमध्ये १५ टक्के इतक्या प्रमाणात आहे.

अखेरीस, राज्यांना कर्ज घेण्यात अडचणी येतात, तेव्हा त्यांना खर्चात कपात करावी लागते. त्यात आरोग्य, शिक्षण आणि इतर दीर्घकालीन मालमत्तेवरील खर्चात कपात हे स्वाभाविकपणे सर्वात आधी असतील. यामुळे नुकसान होईल ते बहुसंख्य गरीब लोकांचे, कारण त्यांना राज्याकडून मूलभूत सेवा आणि मदत नाकारली जाईल. यात फायदा होईल तो श्रीमंत सरकारी कर्मचाऱ्यांचा, ते तुलनेत अल्पसंख्य असतील यात न समजण्यासारखे, अवघड असे काहीच नाही. वेगवेगळ्या पक्षांशी संबंधित अनेक अर्थतज्ज्ञांनी जुन्या पेन्शन योजनेच्या अर्थिक परिणामांवर टीका केली आहे. असे असले तरी, या विनाशकारी प्रस्तावाचे भविष्यातील परिणाम, तसेच त्यातील चुकीच्या गोष्टी सर्वांसमोर आणणे आवश्यक आहे. एक लक्षात घ्या की, निवृत्त होणारे सरकारी कर्मचारी हे भारतातील सर्वोच्च उत्पन्न मिळवणाऱ्या पाच टक्क्यांमध्ये आहेत. सहाव्या आणि सातव्या वेतन आयोगाने सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन राष्ट्रीय पेन्शन योजनेअंतर्गत असतील असे गृहीत धरून सुधारित केले. त्यामुळे, आता जुन्या पेन्शन योजनेमध्ये ते रुपांतरित करणे हे इतर नागरिकांच्या विश्वासाचा भंग करणारे आहे.

इथे माझा दुसरा मुद्दा येतो. काही राजकीय पक्ष श्रीमंत सरकारी कर्मचाऱ्यांना लाभ मिळावेत यासाठी खुलेपणाने वकिली का करत आहेत? असे करून आपण गरिबांना त्यांच्या चांगल्या भौतिक जीवनाचा अधिकार नाकारत आहेत हे त्यांना दिसत नाही का? हे आर्थिक धोरण भयंकर आहे. त्यामुळे या प्रस्तावाला राजकीय भान असणे आवश्यक आहे. पण कर्मचारी हे अल्पसंख्याक असल्याने या प्रस्तावाला राजकीय भान कसे येईल? या संदर्भात दोन स्पष्टीकरणांचा विचार करता येईल.

एक स्पष्टीकरण असे की, हे देऊ, ते देऊ अशी आश्वासने देणे यात नवीन आणि वेगळे काहीच नाही. निवडणूक जिंकण्यासाठी आसुसलेले पक्ष सर्व प्रकारची आश्वासने देतात. काही काळातच, ते कदाचित ती आश्वासने पूर्णही करू शकतात. पण मग सत्ता मिळवून राज्य करायची वेळ येते तेव्हा सत्ताधारी आश्वासनांचे ते अर्थकारण जमण्यासाठी संरक्षण, आरोग्य सेवा इत्यादीसारख्या खर्चात कपात करतात. केंद्रातील सध्याचे सत्ताधारी पुन्हा निवडून आल्यास विरोधी पक्षांना राज्ये आणि केंद्रात आणखी आर्थिक तूट अनुभवास येईल. दुसरे स्पष्टीकरण खरे तर चुकीचे आहे. पक्षांनी जुन्या पेन्शन योजनेच्या राजकीय खर्चाची आणि फायद्यांची चुकीची गणना केली आहे आणि या पक्षांनी काही आगामी निवडणुका जिंकल्या तरी त्यांच्या विजयामागे जुन्या पेन्शन योजनेच्या राजकीय खर्चाची आणि फायद्यांची चुकीची गणना केली आहे अणि या पक्षांनी काही आगामी निवडणुका जिंकल्या तरी त्यांच्या विजयामागे जुनी पेन्शन योजना हा प्रमुख घटक असण्याची शक्यता नाही.

लोक या किंवा इतर कारणांचा विचार करून आपले मत ठरवू शकतात, पण ज्या पक्षाने आर्थिक परिणामांचा विचारही न करता गेली अनेक दशके सत्ता राबवली आहे, तो निवडणुकीतील फायदे दिसत नाहीत, तो पर्यंत गरिबांच्या विरोधात असलेल्या आणि श्रीमंतांना अनुकूल धोरणाबाबत धोका पत्करण्याची शक्यता नाही. विचारसरणी कोणतीही असो, बहुतेक सरकारे श्रीमंतांकडून त्यांची संपत्ती काढून घेऊन ती गरिबांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने वाटता येईल या प्रकारची धोरणे राबवतात. त्यामुळे निर्णय घेताना यापुढील काळात या सर्व बाबी विचारात घेतल्या गेल्या पाहिजेत.

**- आदित्य कुवळेकर**

आज ज्यांना पेन्शन मिळणार आहे, तेही या कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळाली पाहिजे, अशी आग्रही मागणी करतात पण मला याचे वाईट वाटते की, १९९८ साली पाचव्या वेतन आयोगाला विरोध केला तेव्हा गावोगावी माझा धिक्कार याच नोकरीतील कर्मचाऱ्यांनी केला होता. मला शिवीगाळ करणारी किमान १०० पत्र आली, अनेकांनी संबंध तोडले. बहिष्कार घातला. राज्याच्या उत्पन्नातील ६५ टक्के रक्कम जर पगारावर जाणार असेल तर कोणतेही सरकार भविष्यात नोकरभरती करणार नाही, कंत्राटी कर्मचारी भरेल. मला हे सांगताना आनंद होत नाही की, माझे म्हणणे आज खरे ठरत आहे. मागील अर्थिक वर्षात महाराष्ट्र सरकारचा पगार, पेन्शन व व्याज यावरील खर्च हा ६४ टक्के झाला आहे. त्यात वेतनावर १ लाख ४४ हजार कोटी (३२.२१ टक्के), निवृत्तीवेतन ६७ हजार ३८४ कोटी (१४.९९ कोटी) व ५० हजार ६४८ कोटी (११.२६ टक्के) असा ५८ टक्के दाखवला पण प्रत्यक्षात तो ६४ टक्के झाला आहे.

जर सरकार खोटे सांगत असेल तर शिक्षक आमदारांनी त्यावर हक्कभंग दाखल करावा, मी गेली २० वर्षे या विषयाचा अभ्यास करतोय तर याच सरासरीत हे खर्च आहेत आणि पुन्हा हे रिक्त जागा असतानाचा खर्च आहे. राज्यात २० लाख कर्मचारी हवे असताना साडे पाच लाख जागा रिक्त आहेत. निवृत्त झालेले २ लाख ८९ हजार कर्मचारी भरलेच नाहीत, अशी स्थिती आहे. समजा हे साडेपाच लाख कर्मचारी जर भरले तर पगारावरचा खर्च किती प्रचंड वाढेल, याचा अंदाज आपल्याला यायला हवा.

आंतरराष्ट्रीय निकष असे सांगतो की, प्रशासन खर्च १८ टक्क्यांपेक्षा कमी असावा, शरद जोशी म्हणायचे की, पिकाला पाणी देताना पिकाने किती प्यायचे आणि पाटाने किती प्यायचे, याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

शेवटी शासकीय तिजोरी ही कल्याणकारी योजनांसाठी आहे की पगार पेन्शनसाठी आहे, हा गंभीर प्रश्न विचारावा लागेल. विलासराव देशमुख एकदा म्हणाले होते की विकास थांबवता येतो पण पगार थांबवता येत नाही. शरद जोशी तर म्हणायचे की, सरकारी नोकरी फक्त २० वर्षे द्या कारण बेकारी खूप आहे. राज्यात कर्मचारी कुटुंबियांसह फारतर एक कोटी असतील म्हणजे ८ कोटी व त्यांच्यासाठी ५८ टक्के खर्च करणे योग्य आहे का, याच राज्यात भटके विमुक्त लोकांची संख्या दिड कोटी आहे. पण त्यांच्यासाठी किती अल्प तरतूद आहे, एकदा बघा.

निराधार ५० लाख असून फक्त पेन्शन दिड हजार देतोयं आणि एकीकडे सहा लाख कर्मचाऱ्यांच्या पेन्शन वर ६७ हजार कोटी खर्च आपण करत आहोत. हे वास्तव आपल्या गैरसोयीचे असेल तरीही हे बघूनच आपली मांडणी असायला हवी. पेन्शनपेक्षा जास्त महत्वाचा मुद्दा म्हणजे कंत्राटी कर्मचारी सेवेत घेणे हा असला पाहिजे. कारण वर्षानुवर्षे सर्व विभागात कंत्राटी कर्मचारी बिचारे राबत आहेत. त्यांच्याकडे कुणीच लक्ष देत नाही. अनेकांचे लग्न होऊन अजूनही १० ते १५ हजार रुपयांत गुजराण करतात.

महाविद्यालयात दोन लाख त्याच कामाचा पगार एकजण घेताना तर दुसरा कंत्राटी अल्पचारी मानधनात तेच काम करतो. हे बघणे खूप क्लेशदायक आहे.

हे सर्व वास्तव विचारात घेऊन जुनी पेन्शन देण्यासाठी जे उपाय करावे लागतील, त्यात राज्याचा वाढणारा खर्च ध्यानात घेतल्यानंतर वास्तव भयावह असेल. हे वास्तव मान्य केल्यावर आपल्यापुढे दोनच पर्याय आहेत. राज्याचे आजचे उत्पन्न किमान एक लाख कोटीने वाढायला हवे म्हणजे ही टक्केवारी कमी व्हायला मदत होईल किंवा दुसरा उपाय आज जे पूर्वीपासून वंचित आहेत, त्यांनी जुन्या पेन्शनच्या त्यागाची तयारी ठेवायला हवी.

दुसरा उपाय कटू वाटेल पण महत्वाचा आहे. सिंगापूर देशात कर्मचारी यांनी ५ टक्के वेतनकपात मान्य करायला तयारी दाखवली तशी ७०हजारापेक्षा जास्त वेतन असणाऱ्यांनी कपातीची तयारी दाखवावी. जसे किमान वेतन असते तसे देशात कमाल वेतन ही ठरवायला हवे.

आज सचिव, जिल्हाधिकारी, प्राध्यापक यांचे वेतन दिड-दोन लाखांपेक्षा जास्त आहे. ज्या राज्यात कंत्राटी कामगार इतक्या अल्प मानधनावर आहेत, तिथे या मोठ्या वेतनात कपात करून सिलिंग करायला हवे की विशिष्ट रकमेच्या पुढे वेतन कोणाचेही वाढणार नाही, अशी कठोर भूमिका घेतली तरच प्रशासन खर्च कमी होईल.

देशात ५० हजाराच्या पुढे पेन्शन कोणालाच असणार नाही, असा नियम तुम्ही स्वीकारायला तयार असायला हवे. एका घरात एकच पेन्शन मिळेल, असा निर्णय स्वीकारणार का, कारण आपण त्याग केला तरच प्रशासन खर्च कमी होणार आहे.

पती-पत्नी सेवेत असतील तर एकालाच महागाई भत्ता व घरभाडे भत्ता मिळेल, असाही नियम करायला हवा. कारण पती-पत्नी एकाच घरात राहत असतील तर त्यांना दोन भाडे कशासाठी? असे अनेक निकष लावून आज नोकरीत जे ७० हजारांपेक्षा जास्त वेतन घेतात, त्यांनी त्यागाची तयारी दाखवायला पाहिजे.

आमचे हक्क सुरक्षित ठेवा आणि तरीही नोकरभरती करा, कंत्राटी कर्मचारी नेमू नका, सर्वांना पेन्शन द्या, असा कोरडा पाठिंबा देण्यात अर्थ नाही. तुम्ही या मुलांसाठी त्याग करणार का, हा खरा प्रश्न आहे.

या मुद्यावर एक हमखास युक्तिवाद येईल तो म्हणजे तुम्हाला फक्त आमचेच पगार दिसतात, इतर उधळपट्टी दिसत नाही. खासदार निधी, आमदार निधी बंद करून राज्यपालांसारखे पद विसर्जित करावे. प्रत्येक विभागातील होत असलेल्या भ्रष्टाचाराच्या तक्रारींचा निकाल लावायला हवा.

स्मारके, मंदिरे, महामंडळे यांना किमान पाच वर्षे कोणतेच निधी शासनाने देऊ नयेत. तोट्यातील महामंडळे बंद करून नवीन स्थापन करू नयेत. अशा अनेक मुद्यांवर आपण लढलो तर पैसा वाचेल व प्रशासन खर्च कमी होईल. सरकारी तिजोरी ही सोन्याचे अंड देणारी कोंबडी आहे. ती जास्त पगारवाले कापून खात आहेत. त्यांना हे सारे समजून सांगितले पाहिजे. निवृत्तीचे वय देखील ५० करायला हवे म्हणजे कंत्राटी बांधव सेवेत येऊ शकतील.

**- हेरंब कुलकर्णी**
(लेखक सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहेत.)

### आरोग्य खात्यातील कंत्राटी परिचारिकांना कायम करा

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य आरोग्य खात्यीाल कंत्राटी परिचारिकांना सेवेत कायम करण्यात यावे, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते कंत्राटी नर्सेस युनियनच्या वतीने आझाद मैदान येथे आंदोलन करण्यात आले.

या आरोग्य खात्यातील परिचारिका १५-१५ वर्षे सेवा करूनही अजून कायम करण्यात आलेल्या नाहीत. मागच्या सरकारमध्ये जेव्हा देवेंद्र फडणवीस विरोधामध्ये होते तेव्हा त्यांनी सांगितले होते की, आमचे सरकार आल्यावर आम्ही या परिचारिकांना कायम करु, परंतु एकनाथ शिंदे मुख्यमंत्री आणि देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री असून ही मागणी मान्य होत नाहीत, हे दुर्दैव आहे, तरी त्यांना शासकीय सेवेत कायम करावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य आरोग्य कंत्राटी नर्सेस युनियनच्या संगीता रेवडे आणि आयटक राज्य सचिव दिलीप उटाणे यांनी केली आहे.

# कर्मचाऱ्यांच्या वेतनाची लवकरच वसुली

**मुंबई :** शासनाने मंजूर केलेल्या आकृतिबंधनात नसलेली पदे बहाल करून शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन वाढविण्यात आलेल्या विद्यापीठांमध्ये गैरप्रकारातील कर्मचाऱ्यांना देण्यात आलेल्या वाढीव वेतनाची वसूली होणार आहे. कर्मचाऱ्यांच्या वेतनाची वसुली करण्याचा निर्णय उच्च न्यायालयाने योग्य ठरवला.

याबाबत अधिक तपशील असा की, पदनाम घोटाळ्याद्वारे वेतनवाढ झालेल्या १६६२ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून वेतनाची अतिरिक्त वसूली करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे राज्यातील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ. औरंगाबाद विद्यापीठासह सहा विद्यापीठांना तडाखा दिला.

सहा विद्यापीठांमध्ये गेली अनेक वर्षे चाललेल्या या घोटाळ्यामुळे सरकारला प्रतिमहिना कोट्यावधी रुपयांचे नुकसान सहन करावे लागत होते. याप्रकरणी डॉ. अतुल बागुल यांनी याचिका दाखल केली होती. या याचिकेकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले होते.

शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वाढलेल्या पगारावर शासनाच्या तिजोरीतून जवळपास १६०० कोटी रुपये खर्च झाल्याचा अंदाज आहे. पदनामानुसार कर्मचाऱ्यांची किमान वेतनश्रेणी अडीच ते तीन हजारांनी वाढली आहे, तर एकूण वेतनात ८ ते १० हजार रुपये प्रति महिना फरक पडला.

त्यात विद्यापीठांनी हा बदल पूर्वलक्षी प्रभावाने लागू करून कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चित केले. आता यानुसार पुढील कार्यवाही करावी लागणार आहे असे कळविण्यात आले आहे.

### ठराविक केंद्रीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन

**नवी दिल्ली :** देशात जुनी पेन्शन व नवीन पेन्शनवरून वाद सुरू झालेला असतानाच ठराविक केंद्रीय कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन देण्याबाबत सरकारने महत्वाचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, केंद्र शासनाने राज्य शासनांनादेखील पेन्शन लागू करण्याबाबत निर्देश द्यावेत, अशी अपेक्षा कर्मचारी वर्गाकडून व्यक्त होत आहे. पेन्शन आणि पेन्शनर वेल्फेअर विभागातर्फे अधिसूचना जारी केली आहे. यात या जुन्या पेन्शनसाठी कोणते कर्मचारी पात्र आहेत त्याची माहिती देण्यात आली आहे. एनपीएस योजनेची अधिसूचना २२/१२/२००३ रोजी निघाली होती. तर १ जानेवारी २००४ पासून एनपीएस सुरू झाली होती. एनपीएसची अधिसूचना निघण्यापूर्वी जे कर्मचारी सरकारी सेवेत होते, त्यांना जुनी पेन्शन मिळण्याची संधी मिळणार आहे.

# 'मनरेगा' विकासाचे इंजिन :राज्यपाल

## 'मनरेगा' ग्रामीण माणसाला समृध्द करणारी योजना : मुख्यमंत्री

**मुंबई :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही ग्रामीण भागाला समृध्द करणारी योजना असून खऱ्या अर्थाने ते विकासाचे इंजिन आहे. या योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्याचे काम होईल. त्यासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करेल, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) आणि विविध विभागांच्या योजनांचे अभिसरण करून सुविधा संपन्न कुटुंब मिशन राबविणे आणि सर्वांगीण ग्रामसमृध्दी योजनेचा शुभारंभ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे राज्यपाल श्री. बैस यांच्या हस्ते झाला. त्यावेळी आयोजित 'झेप अभिमानाची, स्वाभिमानाची जगण्याची' कार्यक्रमात राज्यपाल श्री. बैस बोलत होते.





यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे, आमदार महेंद्र दळवी, रोहयो आणि इतर बहुजन कल्याण अति. मुख्य सचिव नंदकुमार, 'मनरेगा' आयुक्त शांतनु गोयल उपस्थित होते.

यावेळी बोलताना राज्यपाल श्री. बैस म्हणाले, मनरेगाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील आवश्यक कृषी, शिक्षण अशा सर्व क्षेत्रात काम करता येते. राज्यात सध्या २७ हजाराहून अधिक कामे सुरु आहेत. ग्रामीण भागाला समृध्द करणारी ही योजना आहे. समाजातील तळागाळात सर्वसमावेशक बनविण्याची आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला गती देण्याची ताकद या योजनेत आहे.

'मनरेगा' च्या माध्यमातून ग्रामीण भागात अनेक कामे सुरु आहेत. किमान २०० प्रकारची कामे या योजनेच्या माध्यमातून करता येतात. त्यामुळे ग्रामीण माणसाला सुखी, समृद्ध करणारी ही योजना असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी केले.

ते म्हणाले की, समन्वयातून सुविधा संपन्न कुटुंब आणि ग्राम समृद्धी योजना अतिशय महत्वाची आहे. रस्ते, विहिरी, पाणंद अशा २३० योजना या मनरेगा अंतर्गत आहेत. या सर्व ग्रामसमृद्धीच्या योजना आहेत. या कामांना गती देण्याचे काम राज्य शासन करीत आहे. सर्वसामान्यांचे आशीर्वाद या कामाच्या माध्यमातून मिळतील, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला.

केंद्र सरकारचा आपल्याला पाठिंबा मिळाल्याने अतिशय कमी वेळात जनतेच्या हिताचे महत्वाकांक्षी धोरणात्मक निर्णय आपण घेतले. शेतकऱ्यांच्या दृष्टीने सिंचन प्रकल्पांना मान्यता दिली. त्यातून ५ लाख २१ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यासाठी ३८ हजार कोटी रुपये खर्च करतोय. आपत्तीच्या काळात मदत करण्याची भूमिका घेतली. जे शेतकऱ्यांच्या फायद्याचे आहे, त्याला अधिक प्रोत्साहन देण्याची भूमिका घेत या माध्यमातून काम देणारे हात तयार करण्याचे कार्य करत आहोत, असे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी स्पष्ट केले.

# ग्रामीण डाक सेवकांचे वेतनवाढीसाठी धरणे

**लातूर :** जीडीएस समितीने शिफारस केल्याप्रकारणी सर्व वरिष्ठ ग्रामीण डाकसेवकांना अतिरिक्त वेतनवाढ देण्यात यावी, अव्यवहारिक उद्दिष्ट न देता मानसिक छळ थांबविण्यात यावा यासह विविध मागण्यांसाठी ऑल इंडिया ग्रामीण डाक सेवक युनियनच्या वतीने गांधी चौक येथील मुख्य पोस्ट ऑफिस कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

ग्रामीण डाक सेवकांना एका दिवसात २०० खाते उघडणे, लक्षपूर्तीची कामे जबरदस्तीने करावयास लावणे, उद्दिष्टपूर्ती न झाल्यास मानसिक त्रास देणे नियमाविरूद्ध बदली करणे, विविध भत्यांचे पेमेंट न देणे, अतिरिक्त कामाचा मोबदला देण्यास टाळाटाळ करणे अशा अनेक प्रकारचा त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

त्यानुसार जीडीएस समितीने शिफारस केल्याप्रमाणे वरिष्ठ जीडीएस यांना अतिरिक्त वेतनवाढ द्यावी, उद्दिष्टपूर्तीची सक्ती थांबविण्यात यावी, जीडीएस कर्मचाऱ्यांच्या रजेच्या काळात बदली कर्मचाऱ्यांना हजर राहण्याची परवानगी देण्यात यावी आदी मागण्यांसाठी पोस्ट कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनात युनियनचे अध्यक्ष डी.एम.शिंदे. एम.शेख, पी.एम.सूर्यवंशी, व्ही.पी.बिराजदार, बी.एस.गाडे, आर.के.पटणे, एस.एच.सगर, बी.लोकरे, डी.एस.टकटवळे, डी.बी.पटाडे, एम.बी.सय्यद, के.एस.शेख, एस.जी.कांबळी, ए.महाके, सी.डब्लू.येळीकर, एस.कदम सहभागी झाले होते.

### सुकोमल सेन भवन उद्घाटन सोहळा

**मुंबई :** अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाचे मुख्यालय देशाची राजधानी दिल्ली येथे असावे असे स्वप्न देशभरातील राज्य सरकारी कर्मचारी आणि महासंघाच्या नेतृत्वाने उराशी बाळगले होते. या स्वप्नपूर्तीसाठी अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाने नवी दिल्ली जवळील एक्सॉर्टस् मुझेसर मेट्रो स्टेशनच्या जवळ, फरीदाबाद सेक्टर ११ मध्ये ४७६८.७७ स्वेअर फूट भूखंड खरेदी केला. सन २०१७ पासून प्रत्यक्ष बांधकामाला सुरूवात झाली आणि सन २०२२ मध्ये पाच मजली भव्य मुख्यालय म्हणजेच सुकोमल सेन भवन बांधून तयार झाले. या मुख्यालयाचे उद्घाटन कॉ. तपन सेन, सेंट्रल ट्रेंड युनियनचे राष्ट्रीय सरचिटणीस यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी स्व.र.ग. कर्णिक साहेबांच्या प्रतिमेचे अनावरण सदर भवनाच्या पहिल्या मजल्यावर करण्यात आले. या सोहळ्यास राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना आणि महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

### कणकवली बांधकाम विभाग कार्यालय लवकरच सुसज्ज

**कणकवली :** येथील बांधकाम विभागाचे कार्यालय आता लवकरच नूतनीकरण करून सुसज्ज होणार आहे. नवीन इमारत बांधण्याच्या कामास मंजूरी देण्यात आली असून यासाठी ३.९८ कोटी रुपये निधीस मान्यता मिळाली आहे. याबाबतची माहिती सावर्जनिक बांधकाम मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिली. त्यामुळे कणकवलीतील बांधकाम विभागाचे कार्यालय सुसज्ज व प्रशस्त इमारतीत पाहायला मिळणार आहे.

# कंत्राटी कर्मचाऱ्यांचा वनवास संपला

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमातील गेल्या २० वर्षापासून कंत्राटी पदावर काम करणारे ११ चालक व ४८ वाहक यांचा वनवास संपला असून नगरविकास विभागाने या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा प्रशासकीय आदेश पारित केला आहे.

या कामी महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने या कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा प्रशासकीय आदेश पारित केला आहे. या कामी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सहकार्याने तसेच संघटना अध्यक्ष रवि पाटील यांच्या प्रयत्नाने या कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नगरविकास विभागाचे प्रधान सचिव सोनिया सेठी, केडीएमसी आयुक्त भाऊसाहेब दांगडे, अप्पर सचिव प्रतिभा पाटील, परिवहन व्यवस्थापक दिपक सावंत, उपपरिवहन व्यवस्थापक संदिप भोसले आणि या कार्यात ज्यांनी सहकार्य केले. त्यांच्या संघटना उपाध्यक्ष प्रतिक पेणकर या सर्वांचे कर्मचाऱ्यांच्या वतीने परिवहन कामगार कर्मचारी संघटनेचे सहचिटणीस शरद जाधव यांनी जाहीर आभार मानले आहेत.

महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या आस्थापनेवर कंत्राटी पध्दतीने, तात्पुरत्या स्वरूपात किमान वेतन व ठोक मानधनावर ४८ वाहक व ११ चालक असे एकूण ५९ कर्मचारी कार्यरत असून, त्यांच्या भरतीची कार्यवाही सन २००३ व २००४ मध्ये करण्यात आली होती. नगरपालिका परिवहन मधील कंत्राटी पध्दतीवरील, तात्पुरत्या स्वरूपात कार्यरत असलेल्या चालक/वाहक कर्मचाऱ्यांना, आकृतीबंधानुसार उपलब्ध रिक्त पदांवर, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या नियमित समावेशन करणेबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्याची परिवहन व्यवस्थापक, महानगरपालिका यांनी विनंती केली होती.

कर्मचाऱ्यांचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन उपक्रमाच्या सेवेत समावेशन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

### शिक्षकांना बीएलओची कामे देऊ नयेत : पाडेकर

**अहमदनगर :** ज्ञानदानाचे पवित्र काम करणाऱ्या शिक्षकांना मतदानाचे बूथ स्तर अधिकारी (बीएलओ) म्हणून काम देऊ नये, अशी मागणी शिक्षक भारती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदारांना एका लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

शिक्षकांना अध्यापनाचे काम करायचे असते. असे असताना अकोले तहसील कार्यालयाने शिक्षकांना बीएलओची कामे दिली त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. अशी कामे देऊ नयेत, असे निवेदन शिक्षक भारती संघटनेचे जिल्हा सरचिटणीस महेश पाडेकर यांनी निवासी नायब तहसीलदार ठकाजी महाले यांना दिले. शिक्षकांच्या अन्य मागण्यांबाबतही यावेळी उल्लेख करण्यात आला आहे. त्या सोडविण्याची विनंतीही या निवेदनात केली आहे.

निवेदन देताना माध्यमिक विभागाचे तालुकाध्यक्ष संजय पवार, उच्च माध्यमिकचे तालुकाध्यक्ष संपत वाळके, संपर्क प्रमुख सूरज गायकवाड, अमोल तळेकर, विजय पांडे, बाळू पवार, निशांत बिबवे, विनोद नवले, विजय उगले, पोपट सदगीर उपस्थित होते.

# शासकीय कार्यालयांना अप-डाऊनचे ग्रहण

**साकोली :** भंडारा जिल्हासह सातही तालुक्यांत सेवेसाठी कार्यरत असलेल्या शासकीय, निमशासकीय व खासगी कार्यालयांना अप-डाऊनचे ग्रहण लागले असल्याने नागरिकांना मिळणाऱ्या सेवा गतिरोधक बनल्याचे चित्र आहे.

निमशासकीय कामांसाठी आवश्यक दस्ताऐवज वेळेवर मिळावे, यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे. जिल्हासह तालुक्यातील अधिकारी-कर्मचारी मुख्यालयी राहत नसून नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. कर्मचारी-अधिकाऱ्यांना काही घेणे-देणे नाही. ते फक्त आपल्या वेळेनुसार कार्यालयात येतात आणि जातात.

प्रशासकीय कार्यालयातून अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सुरळीत कामभार होणे अपेक्षित आहे. हा कारभार सुरळीत व्हावा व नागरिकांची कामे सुरळीत व्हावी, याकरिता कर्मचारी-अधिकाऱ्यांना शासकीय निवासस्थाने देण्यात आली. त्यांना मुख्यालयी राहणे हे त्यासाठी बंधकारक आहे. मुख्यालयी राहिल्यास प्राप्त होऊन त्याबाबत प्रशासनाला अवगत करता येते. पंचायत समितीअंतर्गत ग्राम विकास अधिकारी, ग्रामसेवक, आरोग्य कर्मचारी, जिल्हा परिषद शाळांचे शिक्षक, पशुधन व कृषी विभागाचे कर्मचारी यांचा समावेश आहे. काही कर्मचारी राज्याच्या उपराजधानीतून जिल्हा मुख्यालयी चारचाकीने तर, काही महामंडळाच्या बसेसनी ये-जा करतात. चारचाकीने ये-जा करणारे, तर खासगी प्रवासी वाहतुकीसारखी प्रवाशांची ने-आण करतात. तर काही आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक ६० ते ८० किमीचा प्रवास दुचाकीने करीत मुख्यालय गाठतात. अनेक कर्मचारी बाहेरगावावरून येणे-जाणे करीत असल्याने नागरिकांच्या कामांचा खोळंबा होत आहे. आरोग्याच्या दृष्टीने वैद्यकीय उपचारांबाबत बहुतांश आरोग्य कर्मचारी कर्तव्यावर मुख्यालयी राहत नाही.

### आवाहन

'कर्मचारी टाइम्स' मध्ये सर्व संवर्गातील शासकीय अधिकारी, कर्मचारी यांची संबंधीची माहिती, बातम्या तसेच घडामोडी यांची माहिती प्रसिध्द करण्यात येते. त्यामुळे शासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या बातम्या, घडामोडी, लेख प्रसिद्धीसाठी पाठवावेत. जाहिरातीसाठी देखील आवाहन करण्यात येत आहे.

**संपर्क संपादक : 'कर्मचारी टाइम्स', द्वारा राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळ मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई ४०००३२.भ्रमणध्वनी : ९८९०९१६५८८**

**ईमेल : karmacharitimes@gmail.com**

♦♦♦

# मजूरी ३०० रुपये; दिड-दिड महिने मिळेना, लेकरंबाळं जगवावी कशी?

**धाराशिव :** सफाई कामगारांना मजूरी मिळत नसल्यामुळे ते मोठ्या प्रमाणावर हवालदिल झाले आहेत. या कर्मचाऱ्यांनी आंदोलन केले पण यापुढेही प्रश्न न सुटल्यास आंदोलन करण्याची त्यांची मानसिकता झाली आहे.

पालिका विभागात सध्या सफाई कामगारांची संख्या कमी आहे शिवाय जे कर्मचारी काम करत आहेत, त्यांना सुविधा नाही तसेच वेतनदेखील वेळेत मिळत नाही, उन्हाळा हिवाळा असो की पावसाळा. संपूर्ण शहर पहाटे गाढ झोपेत असताना रस्त्यांवर वावर असतो तो सफाई कामगारांचा. मात्र, सफाई कामगारांना सध्या आपल्या घामाच्या पैशांसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. वेळोवेळी मागणी करूनही हक्काची मजुरी काही मिळाली नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या शेकडोच्या संख्येने मजूरांनी पालिका गाठली. प्रवेशद्वारातच ठिय्या दिला. पाच-सहा आठवड्यांची मजूरी मिळत नसेल तर, आम्ही लेकरंबाळं जगवावी कशी? हे नगरपालिका अन् ठेकेदारानं पुढं येऊन सांगावं, अशा शब्दांत या कर्मचाऱ्यांनी संताप व्यक्त केला.

सध्या स्वच्छता विभागाकडे नियमित सफाई कामगारांची संख्या नगण्यच आहे. अपुऱ्या मनुष्यबळावर संपूर्ण शहराची स्वच्छता करणे शक्य नसल्याने ठेकेदाराकडून मजुरांची मदत घेतली जाते. आजघडीला असे साधारणपणे साडेतीनशे ते चारशे रोजंदारी मजुरांच्या खांद्यावर शहर दुर्गंधीमुक्त ठेवण्याची धुरा आहे. मात्र, मागील काही महिन्यांपासून या मजुरांना त्यांच्या हक्काची मजुरी वेळेवर मिळत नव्हती. प्रत्येक महिन्यात एक-दोन आठवडे ड्रॉप केले जात होते. पहाटे उठून शहर दुर्गंधीमुक्त करूनही घामाचे पैसे मिळत नसल्याने मजूरांमध्ये नाराजी व्यक्त होत होती. मात्र, मजुरी काही हाती पडली नाही. संतप्त झालेल्या (तीनशेवर) मजुरांनी शहर स्वच्छतेचे काम बंद ठेवत थेट पालिका गाठली.

आमच्या घामाचे पैसे द्या, तोवर दारातून उठणार नाही, अशी कठोर भूमिका घेतली. आमची घरं मजुरीच्या पैशांवर चालतात आणि चार-पाच आठवडे जर हक्काची मजुरी मिळत नसेल तर आम्ही आमची लेकरंबाळं जगवावीत कशी? असा संतप्त सवालही पालिकेला केला. बराच काळ मजूर पालिकेच्या प्रवेशद्वारात तळ ठोकून होते. यानंतर संबंधित ठेकेदाराने त्यांना मजूरी देण्याबाबत ग्वाही दिली. यानंतर मजूरांनी पालिका सोडली.

## वर्गणीदारांसाठी सूचना

१. **'कर्मचारी टाइम्स'** अंकाची वर्षिक वर्गणी ३०० रुपये असून कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होऊ शकता.

२. वर्गणी मनीऑर्डर, धनादेश, डिमांड ड्राफ्ट, ऑनलाईन किंवा युपीआयद्वारे स्वीकारली जाते. कार्यालयात प्रत्यक्ष रोख रक्कम भरूनही वर्गणीदार होता येते.

३. वर्गणी भरताना सोबत स्वतःचे नाव, पत्ता सुवाच्य अक्षरात नोंद करणे, ही वर्गणीदाराची जबाबदारी आहे.

४. मनीऑर्डर स्लीप भरताना त्यावर संपूर्ण नाव, पत्ता व संपर्क क्रमांक लिहावा.

५. **'कर्मचारी टाइम्स'** कार्यालयात वर्गणी प्राप्त झाल्यानंतर उशीरात उशीरा २ महिन्यांच्या आत आपला अंक सुरु करण्यात येतो.

६. **'कर्मचारी टाइम्स'** चे सर्व अंक दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात बहुधा १ तारखेलाच पोस्टात दिले जातात. तेव्हा १५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास १ तारखेपूर्वी स्थानिक टपाल कचेरीत तक्रार नोंदवून त्या तक्रार प्रतीसह **'कर्मचारी टाइम्स'** कार्यालयास कळवावे. अंक पाठविण्यात येईल. तक्रारीत वर्गणीदार क्रमांक कळविणे आवश्यक आहे.

७. एक महिना उलटून गेल्यानंतर आलेल्या तक्रारी, टपाल कचेरीत तक्रार न नोंदविता आलेल्या तक्रारी, दूरध्वनीवरील तोंडी तक्रारी यांची नोंद घेतली जाणार नाही.

८. लेखी तक्रार नोंदवूनही दखल घेतली जात नाही, वारंवार कळवूनही पत्ता बदलला जात नाही, वर्गणीची मुदत संपण्यापूर्वी अंक बंद झाला, अशा स्वरुपाच्या तक्रारी आपण संपादकांकडे अवश्य करू शकता, त्याची दखल घेतली जाईल.

९. अर्धवट पत्त्यामुळे बऱ्याच वर्गणीदारांचे अंक परत येत असतात, यापुढे सलग तीन महिने अंक परत येतील, त्यांची वर्गणी संबंधित वर्गणीदार जोपर्यंत लेखी तक्रार नोंदवून पूर्ण पत्ता कळवत नाही, तोपर्यंत स्थगित ठेवण्यात येईल.

१०. **'कर्मचारी टाइम्स'** चे अंक किरकोळ विक्रीसाठी **'कर्मचारी टाइम्स'** कार्यालयात उपलब्ध असतात, याची नोंद घ्यावी.

**संपर्क :** राज्य सरकारी गट 'ड' (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळ मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई - ४०००३२.

**संपर्क :** ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६

**ईमेल :** karmacharitimes@gmail.com

**वेबसाईट :** www.karmacharitimes.com

### 'कर्मचारी टाइम्स'चे कार्यालयीन प्रतिनिधी

१. भाऊसाहेब पठाण
२. सुरेश आहेरकर
३. अशोक शिंदे
४. छाया करे
५. रिध्दी कुबल
६. गुरुदत्त वाकदेकर

# नाशिक येथे कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची राज्यस्तरीय परिषद

**नाशिक :** महाराष्ट्रातील कामगार संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची परिषद सीटू, कामगार भवन, खुटवडनगर, नाशिक येथे आयोजित करण्यात आली.

सीटूचे राज्य अध्यक्ष डॉ. डी. एल. कराड यांनी विविध कामगार संघटनांचे प्रतिनिधीचे स्वागत केले. प्रास्ताविक डॉ. विवेक मॉंटेरे यांनी केले तसेच नियमावलीच्या मसुद्याचा प्रस्ताव मांडला. या नियमावलीतील चर्चेत ८ प्रतिनिधींनी सहभाग घेतला तर काही महत्वाच्या सूचना दिल्या. कृती समितीच्या नावात महाराष्ट्र कामगार संघटना तसेच कृती समिती असा बदल करण्याचा निर्णय झाला.

परिषदेत सर्व कामगारांना दरमहा २६ हजार रुपये किमान वेतन लागू करा, कामगारविरोधी चार श्रमसंहिता रद्द करा, कामगार विरोधी श्रमसंहितांची अंमलबजावणी करणे नका, एनपीएस रद्द करून जुनी पेन्शन योजना लागू करा, असंघटित कामगारांना सेवाशर्ती, किमान वेतन व कल्याणकारी योजना लागू करा, तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्था मजबूत करा, प्रस्तावित शेतकरी, श्रमिक, जनता विरोधी केंद्रिय वीज दुरुस्ती विधेयक मागे घ्या, नवे शैक्षणिक धोरण रद्द करा, अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या.

साथी संजय वढावकर यांनी सरकारच्या कामगारविरोधी धोरणांचा जोरदार विरोध केला व आपल्या हक्कांचे रक्षण करायचे असेल तर श्रमिक वर्गाने एकत्र येऊन लढा देऊन या सरकारचा आगामी निवडणूकीत पाडाव करायला हवा, असे प्रतिपादन केले. डॉ. डी. एल. कराड यांनी आगामी काळात किमान वेतन, कंत्राटी कामगार, योजना कर्मचारी अशा सर्वासाठी पेन्शन अशा विविध विषयांवर परिषदा घ्याव्यात, त्यातून न्याय मिळवून द्यावा, अशी कल्पना मांडली.




**राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाचे राज्य अध्यक्ष मा. भाऊसाहेब पठाण यांच्या नेतृत्वाखाली रास्त मागण्याकरिता दि. १४ मार्च २०२३ पासून बेमुदत संपाची हाक देण्यात आली होती. त्यावेळी त्याच्या पूर्वतयारीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय औरंगाबाद येथे कर्मचाऱ्यांस आंदोलनाची माहिती देताना राज्य उपाध्यक्ष सुरेश आहेरकर तसेच विभागीय उपाध्यक्ष रवि दाभाडे, संजय नंदाने, मोहन सोलार, अशोक देशमुख, मथुराबाई थोरात, अजय डूलगज, राधाकृष्ण खरात, संगीता पंडूरे इत्यादी कर्मचारी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी कर्मचाऱ्यांचाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.**

# सरकारी नोकरीसाठी वयोमर्यादेत वाढ
## राज्य सरकारचा महत्वपूर्ण निर्णय

**मुंबई :** कोरोना काळात दोन वर्षे नोकर भरती झालेली नव्हती. त्यामुळे अनेक उमेदवारांचे नोकरीचे वय निघून गेले. त्यासाठी राज्य सरकारने वयाची मर्यादा शिथिल करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचे परिपत्रक जारी केले आहे. या निर्णयामुळे नोकरीसाठीची वयोमर्यादा दोन वर्षांनी वाढली आहे. कोरोना महामारीमुळे राज्यात दोन वर्षे सरकारी नोकरभरती निघाली नव्हती. त्यामुळे वय संपलेल्या विद्यार्थ्यांना आता अर्ज करता येत नव्हते. त्यामुळे वय संपलेल्या विद्यार्थ्यांची वयाची मर्यादा शिथिल करण्याची मागणी केली होती. महाराष्ट्र राज्य सरकारने याबाबतचा निर्णय घेतला आहे. सामान्य प्रशासन विभागामार्फत परिपत्रक जारी करण्यात आले आहे. सरळ सेवेत भरल्या जाणाऱ्या पदांमध्ये भरतीसाठी वयोमर्यादेत दोन वर्षे वाढवून देण्यात आले आहेत.

शासनाच्या विविध विभागात सरळ सेवा भरती प्रक्रियेतून जाणाऱ्या उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ही ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत दोन वर्षे वाढवून दिली आहेत. सामान्य प्रशासन विभागाने त्या संदर्भातील परिपत्रक जारी केले आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या निमित्ताने राज्य शासनातील विविध विभागांत ७५ हजार नोकर भरतीची घोषणा सरकारने केली होती. त्या नोकर भरतीत हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरेल. त्याचबरोबर या निर्णयाचा उपयोग विविध घटकांना होणार आहे. खुल्या प्रवर्गाची कमाल वयोमर्यादा यामुळे ३८ ऐवजी ४० वर्षे होईल. तर मागास प्रवर्गासाठी कमाल वयोमर्यादा ४३ ऐवजी ४५ वर्षे होईल. वयोमर्यादा ही सूट ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत लागू राहील.

# पुनर्नियुक्ती कधी देता? वीज सेवकांचा सवाल

**गडचिरोली :** पेसा क्षेत्रात कार्यरत असलेल्या १५६ ग्रामवीजसेवकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. आपल्या मागण्या मान्य करा, अन्यथा पुन्हा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

ग्रामवीजसेवक संघटना गडचिरोलीच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात येत आहे. याविषयी पेसा अंतर्गत १५६ ग्रामवीजसेवकांना २०२२-२०२३ करिता पुनर्नियुक्ती आदेश देण्यात यावे, मासिक मानधन त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावे, मासिक मानधन २० हजार रूपये करण्यात यावे, विमा काढावा, टुल कीट, आयडेंटी कार्ड प्रशिक्षण देण्यात यावे, ग्रामवीजसेवकांचा अनुभव लक्षात घेता, त्यांना वीज वितरण कंपनीच्या सेवेमध्ये सामावून घेण्यात यावे, या मागण्यांसाठी हे वीज कर्मचारी बेमुदत उपोषणाला बसलेले आहेत.

महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांना याबाबत निवेदन सादर करण्यात आले असून त्यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषणाला सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी उपोषणकर्ते ग्रामवीजसेवक संघटनेचे अध्यक्ष प्रभाकर नरोटे, उपाध्यक्ष गजानन परचाके, सचिव नैना किरंगे, पवन आत्राम, प्रेमानंद मडावी व इतर १५६ ग्रामवीजसेवक उपोषणाला बसलेले आहेत.

दुसऱ्या दिवशीही आंदोलन सुरुच होते. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा वीजसेवकांनी दिला आहे. ग्रामवीजसेवक २०१६ पासून काम करीत आहेत. त्यांना कधीच वेळेवर नियुक्तीपत्र दिले जात नाही.

## 'सुपर'चे कर्मचारी संपावर

**अमरावती :** विभागीय संदर्भ रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) येथील कंत्राटी कामगारांनी दोन महिन्यांपासून वेतन नसल्यामुळे कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे आता कर्मचाऱ्यांनी वेतन नाही तर काम नाही, अशी भूमिका घेत संप पुकारला आहे. कर्मचारी वर्गाने 'सुपर'च्या अधीक्षकांच्या दालनात आंदोलन केले. मागण्या मान्य न केल्यास यापेक्षाही अधिक तीव्र आंदोलन करण्याचा इशारा कर्मचारी वर्गाने दिला आहे.

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या सेवा सुरक्षित केल्या आहेत. असे असतानाही कंत्राटी कर्मचाऱ्यांचे दोन महिने वेतन मिळाले नसल्याचे कर्मचारी वर्गाचे म्हणणे आहे. याबाबत शासकीय स्तरावरून योग्य ती दखल घेण्यात यावी आणि कार्यवाही व्हावी, अशी कर्मचारी वर्गाची मागणी आहे.

# कर्मचारीच अपुरे; कामे कसे होतील पूर्ण!

**वाशिम :** वाशिम पंचायत समितीत कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने कामे प्रभावित होण्याचा धोका वर्तविण्यात येत आहे. रिक्त पदे भरण्यात यावी तसेच प्रतिनियुक्तीवर जिल्हा मुख्यालयात घेतलेल्या कर्मचारी वर्गाला परत पाठवावे, अशी मागणी पंचायत समिती सदस्य विद्या दीपक खडसे यांनी जिल्हा परिषद प्रशासनाकडे केली.

वाशिम पचांयत समितीला नियमित गटविकास अधिकारी नाहीत. या पदाचा पदभार मालेगावचे गटविकास अधिकारी किशोर काळपांडे यांच्याकडे सोपविला आहे.

सध्या सहायक गटविकास अधिकाऱ्यांची पदही रिक्त आहे. शाखा अभियंत्यांची अशी दोन्ही पदे रिक्त असून, कनिष्ठ अभियंत्यांचे दोनपैकी एक पद रिक्त आहे. एक विस्तार अधिकारी प्रतिनियुक्तीवर अन्यत्र देण्यात आला तर वरिष्ठ सहायकाच्या चार पदांपैकी तीन पदे भरलेली आहेत. यातील एक कर्मचारी प्रतिनियुक्तीवर अन्यत्र वळविण्यात आला.

कनिष्ठ सहायकांची १० पदे मंजूर असून, ३ पदे रिक्त आहेत. कनिष्ठ सहायक (लेखा) पद सुद्धा रिक्त असून गटशिक्षणाधिकारी देखील नियमित नाहीत. अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचा अनुशेष वाढत असल्याने प्रशासकीय कामकाज प्रभावित होत असल्याचे पं.स. सदस्य विद्या खडसे यांनी जिल्हा परिषद प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. याबाबत प्रशासकीय पातळीवर वेळीच योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, जेणेकरून कर्मचारी वर्गाला मोठा दिलासा मिळू शकेल, अशी अपेक्षा यानिमित्ताने व्यक्त करण्यात येत आहे.

## एक रुपयात नोंदणी करा; योजनांचा लाभ मिळवा

**श्रीरामपूर :** असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या बांधकाम कामगारांसाठी 'महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळा' च्या वतीने विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. यासाठी अशा कामगारांना कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी करावी लागते. ही नोंदणी केवळ एका रुपयात होते.

ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील कामगार ग्रामसेवक किंवा नोंदणीकृत ठेकेदारांकडून तर शहरातील मुख्याधिकारी यांच्याकडून प्रमाणपत्र घेऊन ऑनलाईन नोंदणी अर्ज करू शकतात. हा ऑनलाइन अर्ज आपले सेवा केंद्रावरुन त्यांना करता येतो. बांधकाम क्षेत्रातील मजूर हे असंघटित असून त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. तसेच अनेकजण या योजनांबाबत अनभिज्ञ आहेत, त्यांना शासनाच्या या निर्णयाचा फायदा होणार आहे.

# शिंदखेडा तालुक्यात ७ नवीन महसूल मंडळ

**शिंदखेडा :** तालुक्यातील १० महसूल मंडळाची फोड करून पिंपराड, गोराणे, तामथरे, रंजाने, मालपूर, निमगुळ व बाम्हणे असे ७ नवीन महसूल मंडळ तयार करण्यात आले आहे. आता शिंदखेडा तालुक्यात एकूण १७ महसूल मंडळ, त्यात ९९ सज्जे झाले आहेत.

शासनाच्या आदेशानुसार उपविभागीय अधिकारी शिरपूर यांनी नुकतीच मंजुरी दिली आहे. नवीन रचनेनुसार शिंदखेडा तहसीलमध्ये ११ मंडळ तर दोंडाईचा अप्पर तहसीलमध्ये ६ मंडळ राहणार आहेत.

शिंदखेडा तालुक्यातील नव्याने तयार झालेल्या १७ महसूल मंडळ व त्यात समावेश केलेली गावे खालीलप्रमाणे : शिंदखेडा मंडळ : शिंदखेडा, पाटण, सुलवाडे, वरूड, घुसरे, परसामळ, कुंभरेज, भडणे, चिरणे, कदाणे या गावांचा समावेश आहे.

वर्षी : वर्षी, सुकवद, तावखेडा प्र.बे.दसवेल, निरगुडी, टेमलाय, वरसुस, आक्कडसे, पिंप्राड (नवीन) : पिंप्राड, अजंदे खुर्द दभाशी, दत्ताने, गव्हाणे, शिराळे, कमखेडा, होळप्रबे, हुंबर्डे, वडली.

नरडाणा : नरडाणा, वारूळ, पाष्टे, जातोडा, मळीच मेलाने. बेटावद : बेटावद, मुडावद, म्हळसर वडोदे, विकवेल, पडावद, भिलाने दिगर. गोराणे, कलमाडी, बाभळे, कंचनपूर, तामथरे, अमराळे, आराळे, जखाने, चिमठावळ, सोडले, डांगुर्णे. रंजाने (नवीन) : रंजाने, जसाने, चिलाने, लोहगाव, वसमाने, कळगाव, कुंभारे प्रण, या गावांचा समावेश आहे.

प्रत्येक मंडळाला मंडळ अधिकारी व प्रत्येक गावात तलाठ्यांच्याही नेमणुका करण्यात आल्या आहेत. नवीन मंडळांच्या निर्मितीमुळे कामकाज सुलभ होण्याची शक्यता आहे.

## माणगाव दिवाणी न्यायालयाचे उद्घाटन

**माणगाव :** माणगाव येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर न्यायालयाचा उद्घाटन सोहळा माणगाव जिल्हा सत्र न्यायालय परिसरात पार पडला.

या न्यायालयामुळे येथील पक्षकारांना जलद व योग्य न्याय मिळेल, असा विश्वास उच्च न्यायालयाचे मुंबई तथा पालक न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी सांगितले. यावेळी पक्षकार, वकील, न्यायालयाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. माणगाव येथील गरज विचारात घेऊन न्यायालयाची सुरूवात होत आहे. त्यातून सर्वांना नक्कीच समाधान मिळेल व न्याय-प्रक्रियेला वेग येईल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# आधारकार्ड अपडेट असेल तरच खात्यावर मजुरी!

**गोंदिया :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी डिजिटल हजेरी बंधनकारक करण्यात आली आहे.

या कार्यवाहीनंतर मजुरांचे आधारकार्ड लिंक असलेले बँक खाते मजुरी जमा करण्यासाठी बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, यासाठी मजुरांचे आधारकार्ड अपडेट असणे आवश्यक आहे, अन्यथा बँक खात्यावर मजुरीची रक्कम जमा होण्याची अडचण येणार आहे.

मनरेगाच्या कामाच्या हजेरी पत्रकावर बोगस मजुरांची नावे नोंदवून मजुरीची उचल केली जात होती. जिल्हात असे प्रकार अनेक ठिकाणी उघडकीस आले होते, तर आता यासंदर्भातील तक्रारींमध्ये सुद्धा वाढ झाली होती. त्यामुळे केंद्र शासनाने या अनागोंदी कारभाराला कायमचा पायबंद लावण्यासाठी डिजिटल हजेरीचा निर्णय घेतला.

या योजनेंतर्गत काम करणाऱ्या कामाच्या ठिकाणी नॅशनल मोबाईल मॉनिटरिंग सिस्टम या मोबाइल ॲपवर मजुरांची दैनंदिन नोंदणी करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. सार्वजनिक कामासाठी हा निर्णय आता बंधनकारक करण्यात आला आहे. त्यामुळे आता मनरेगाच्या कामावरील मजुरांचे पैसे थेट मजुरांच्या बँक खात्यावर जमा केले जाणार आहे. पण, यासाठी आधारकार्डसह मजुरांचे बँक खाते लिंक असणे अनिवार्य आहे. शिवाय आधारकार्ड अपडेट असणे आवश्यक आहे.

रोजगार हमी योजनेतील अनेक मजूर हे असंघटित आहेत तसेच अनेकांना योजनांबाबतची माहिती नाही. अशावेळी त्यांना योग्य माहिती प्राप्त होण्यासाठी प्रसार व प्रचार होणे गरजेचे आहे. यापैकी अनेक मजूरांची खातीदेखील नाहीत. अशा परिस्थितीत त्यांना त्यांची मजुरी योग्यप्रकारे मिळावी, यासाठी हा उपक्रम निश्चित फायदेशीर ठरणार आहे. आधारकार्ड अपडेट करणे हेदेखील या योजनेतील महत्वाची बाब असून मजूरांना फायदेशीर आहे.

## आश्रमशाळांतील शिक्षकांच्या वेतनश्रेणीसाठी सकारात्मकता

**मुंबई :** शाहू, फुले, आंबेडकर निवासी आणि अनिवासी आश्रमशाळेतील शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करण्यासाठी शासन सकारात्मक असल्याचे या विभागाचे मंत्री संजय राठोड यांनी विधानपरिषदेत सदस्य विक्रम काळे यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर बोलताना सांगितले.

ते म्हणाले की, अनुसूचित जातीसाठीच्या आश्रमशाळांना अनुदान देणे ही केंद्र सरकारची योजना होती. कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू करण्याबाबत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे प्रस्ताव दिलेला असून यासंदर्भात शासन सकारात्मक आहे, असेही श्री. राठोड म्हणाले.

# तलाठ्यांना मिळाले १२ दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण

**धुळे :** येथील प्रशिक्षण संस्थेच्या सभागृहात तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांचे १२ दिवसांचे पायाभूत प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते. त्यात माहिती अधिकारासह विविध विषयांवर महाराष्ट्राची शिखर प्रशिक्षण संस्था यशदा पुण्याचे मास्टर ट्रेनर डॉ. योगेश हिंमतराव सूर्यवंशी यांनी प्रशिक्षण दिले. माहिती अधिकारी अधिनियम २००५ आणि लोकसेवा हमी हक्क कायदा २०१५ या दोन कायद्यांचे सखोल प्रशिक्षण दिले. डॉ. सूर्यवंशी यांनी सांगितले.

भारत हा जगातील सगळ्यात मोठा लोकशाही देश आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारताला घटना मिळाली. त्यामुळे भारत देश हा प्रजासत्ताक देश झाला. भारतात प्रजेची सत्ता असून भारताचे नागरिक हे मालक तर सरकारी अधिकारी आणि कर्मचारी हे नोकर आहेत; मात्र देशाचे मालक जेव्हा कार्यालयात आपले काम घेऊन येतात तेव्हा त्यांना नोकरासारखी वागणूक मिळते. या परिस्थितीत बदल व्हावा यासाठीच देशातील लोकांच्या आणि सामाजिक संघटनाच्या दबाव, आंदोलने पाठपुरावा, प्रयत्न आणि सरकारवरील दबाव यामुळे नागरिकांना सहज झटपट न्याय, माहिती आणि सेवा मिळावी यासाठी काही कायदे करावे लागलेत. जर भारतातली ७० टक्के लोकांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा व्यवस्थित वापर केला तर देशातील शंभर टक्के भ्रष्टाचार मुक्त देश होणे कठीण नाही. तसेच भारतीय नागरिकांना त्यांच्या हक्काच्या सेवा या वेळेत मिळणे हा त्यांचा हक्क असून त्यांना घटनेने हा अधिकार दिलेला आहे. यामुळे सरकारी काम आणि सहा महिने थांब ही संकल्पना आता मोडीस निघालेली आहे. याबाबतचे वरील दोन्ही कायद्यांच्या प्रत्येक कलमानुसार तलाठी वर्गातील कर्मचाऱ्यांना सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाबाबत सकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त होत असून उपक्रम उपयुक्त ठरल्याचे अनेकांनी सांगितले.

# म. फुले मागासवर्ग विकास महामंडळ योजनांसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई :** अनुसूचित जाती व नवबौद्धांसाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ राबवीत असलेल्या ५० टक्के अनुदान योजना, बीज भांडवल योजना तसेच केंद्र शासनाच्या एनएसएफडीसी उच्च शैक्षणिक योजनेसाठी कर्ज प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ योजनेसाठी अर्ज करणारा अर्जदार हा अनुसूचित जाती/नवबौद्ध संवर्गातील असावा व त्याचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे. त्याचबरोबर राज्य महामंडळाच्या योजनेकरिता वार्षिक उत्पन्न मर्यादा शहरी व ग्रामीण भागाकरिता रुपये ३ लाख असावी. केंद्रीय महामंडळाच्या योजनांकरिता वार्षिक उत्पन्न रु. ३ लाख इतके आहे.

महामंडळाच्या नियमानुसार उच्च शैक्षणिक योजनेकरिता कागदपत्रे तसेच अन्य आवश्यक बाबींची पूर्तता सादर करावी, अधिकाधिक इच्छुकांनी असे आवाहन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जिल्हा कार्यालय यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## शिपाई ते निरीक्षकांना वर्षात २० नैमित्तिक रजा

**मुंबई :** राज्य पोलिस दलातील पोलिस शिपाई ते पोलिस निरीक्षक या पदावरील अधिकारी, कर्मचाऱ्यांना एका कॅलेंडर वर्षात देय असलेल्या १२ दिवसांच्या नैमित्तिक रजांऐवजी जास्तीत जास्त २० (वीस) दिवस नैमित्तिक रजा विशेष बाब म्हणून अनुज्ञेय करण्यात आली आहे. याबाबत ३ ऑक्टोबर २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले. या निर्णयामुळे पोलिस तसेच निरीक्षकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

# शिक्षकांच्या बदल्या झाल्या; पण नियुक्ती मे महिन्यात

**सोलापूर :** जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या ऑनलाइन पध्दतीने झाल्या आहेत. मात्र, नव्या ठिकाणी नियुक्तीसाठी मे महिन्यांची वाट पाहावी लागणार आहे. नव्या शैक्षणिक वर्षातच शिक्षकांना नवी शाळा मिळेल.

जि.परिषदेतील प्राथमिक विभागाच्या शिक्षकांची बदली पोर्टलवर २०२१-२२ मध्ये माहिती भरली होती. त्या शिक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. यामध्ये मुख्याध्यापक, उप-शिक्षक, विषय अशा विविध प्रकारच्या शिक्षकांचा समावेश आहे.

संवर्ग - १ मधील गंभीर आजार असलेले, ५३ वर्षाच्या पुढील शिक्षक, दिव्यांग शिक्षक अशा १८१ शिक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. संवर्ग - २ मध्ये पती पत्नी एकत्रीकरण बदल्यामध्ये ९८ शिक्षकांच्या बदल्या झाल्या आहेत. संवर्ग - ३ मध्ये डोंगराळ भाग, अवघड क्षेत्र असलेल्या शिक्षकांच्या बदल्या होत असतात. मात्र अवघड क्षेत्र नसल्याने या संवर्गातील बदल्या करण्यात आल्या नाहीत.

## वाडा तहसीलदारपदी भाऊसाहेब अंधारे

**वाडा :** तहसीलदारपदी तीन वर्षांपासून कार्यरत असलेले डॉ. उद्धव कदम यांची बदली झाली आहे. आता त्यांच्या जागी भाऊसाहेब अंधारे यांची नियुक्ती झाली आहे. डॉ. कदम यांनी तहसीलदारपदी असताना दीड वर्ष वाडा नगरपंचायतमध्ये प्रशासक म्हणूनही काम पाहिले आहे. वाडा येथे नव्याने रुजू होत असलेले अंधारे हे यापूर्वी रायगड जिल्हातील उरण तालुक्याचे तहसीलदार म्हणून कार्यरत होते. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे स्वागत करतानाच त्यांनी जनतेची न्याय्य कामे करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# भारतीय नाविक आणि कुटुंबासाठी प्रशिक्षण व कल्याणाकारी उपक्रम

**मुंबई :** नॅशनल युनियन ऑफ इंडियाचे सरचिटणीस मिलिंद कांदळगांवकर आणि मेरीटाईम युनियन ऑफ इंडियाचे सर-चिटणीस कॅप्टन तुषार प्रधान यांच्या नेतृत्वाखाली ऑल जपान सिमेन्स युनियन (जेएसयु) आणि इंटरनॅशनल मरीनर्स मॅनेजमेंट असोसिएशन ऑफ जपान यांच्या प्रतिनिधींसोबत भारतीय नाविक व त्यांच्या कुटुंबियांसाठी भविष्यकालीन प्रशिक्षण व कल्याणकारी उपक्रम यांची चर्चा या रचनात्मक बैठकीत झाली.

न्यूसी त्यांच्या नारी शक्ती या उपक्रमाखाली विशेषत: नाविकांच्या कुटुंबातील महिलांचे सक्षमीकरण करण्यास प्राधान्य देते. न्यूसी स्त्री शक्ती सपोर्ट या सहाय्य उपक्रमाचे अनावरण ऑल जपान सिमेन्स युनियनचे अध्यक्ष मित्सुहरा मत्सुरा आणि इंटरनॅशनल मरीनर्स मॅनेजमेंट असोसिएशन ऑफ जपानचे अध्यक्ष तोशिहितो इनोवे यांच्या हस्ते झाले. या उपक्रमामुळे जास्तीत जास्त महिला मर्चन्ट नेव्हीत करिअर करण्यासाठी प्रोत्साहित होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# जुनी पेन्शन योजना व चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या रास्त मागण्याकरिता आंदोलन !

राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघाच्या वतीने दि. १४ मार्च २०२३ पासून बेमुदत संपास प्रत्येक जिल्ह्यात तीव्र आंदोलन करण्यात आले. महासंघाचे नेते भाऊसाहेब पठाण यांच्या नेतृत्वाखालील आंदोलात सहभागी झालेले राज्यभरातील सर्व पदाधिकारी व कर्मचारी बंधू-भगिनी संपात सहभागी झालेले दिसत आहे.








# सांगली जिल्हा सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांची अग्रगण्य संस्था

स्था. ४/१०/१९१२ रजि. नं. १९१२८

## दि सांगली सॅलरी अर्नर्स को-ऑप. सोसायटी लि. सांगली

११०४-ब, हरभट रोड, सांगली :-२३३१४४२ / २३३२००८

-: शाखा :- मिरज २२२७४७९, इस्लामपूर २२४३८०, तासगांव २४२४४५, जत २४८९३०, शिराळा २९५४९२, विटा २७२१२२, विजयनगर २६०२४४२, कोल्हापूर २६६१४४२, कराड २२१४४१

**दि. ३०/०९/२२ अखेरची संस्थेची माहिती**

| ऑडीट वर्ग अ |
|---|
| नफा ८.६६ कोटी (३१/३/२२ अखेर) |
| सभासद संख्या ९१३६ |
| कर्ज- २८२ कोटी |
| भांडवल - ७१.३३ कोटी |
| गुंतवणूक ३२.६१ कोटी |
| ठेवी- २०६ कोटी |
| राखीव निधी - २२.५३ कोटी |

| संस्थेचे ठेवीवरील आकर्षक व्याज दर |
|---|
| मुदत ठेव :- |
| ३० दिवस ते ४५ दिवस - ४.२५ टक्के<br>ज्येष्ठ नागरीक ४.७५ टक्के |
| ४६ दिवस ते १८० दिवस- ५.२५ टक्के<br>ज्येष्ठ नागरीक ५.७५ टक्के |
| १८१ दिवस ते १ वर्ष ६.२५ टक्के<br>ज्येष्ठ नागरीक - ६.७५ टक्के |
| १ वर्ष १ दिवस ते ३ वर्ष - ७.५० टक्के<br>ज्येष्ठ नागरीक - ८ टक्के |
| ३ वर्ष १ दिवस ते ७ वर्ष - ६.७५ टक्के<br>ज्येष्ठ नागरीक - ७.२५ टक्के |

**दामदुप्पट ठेव :-** १२४ महिने ८ दिवस
**दामदिडपट ठेव :-** ७२ महिने २२ दिवस
**पेन्शन ठेव :-** रु. १ लाख ठेवीवर मासीक व्याज रु.६२१ (मुदत ३ वर्षे)
**रिकरींग ठेव :-** मासिक रु.१००० असेल तर वर्षानंतर रु. १२४१०/- परत
**ठेव तारण कर्ज :-** ठेव रकमेच्या ८०% **ज्येष्ठ नागरीकांना ठेव तारण कर्जास ०.५% व्याज सवलत**

श्री. विजय महादेव शिरगांवे, सेक्रेटरी — सौ. सुलताना आन्सार जमादार, व्हा. चेअरमन — श्री. नित्यानंद सज्जन मोहिते, चेअरमन

-: संचालक मंडळ :-

श्री. शक्ती श्रीकांत दबडे, श्री. रणधीर सुरेश पाटील, श्री. महादेव रामचंद्र वंजारी, श्री. संजय वसंत माने, श्री. संदिप हणमंतराव हिरुगडे, श्री. मोरेश्वर मुकुंद रामदासी, श्री. गणेश पांडुरंग घुमाळ, श्री. शरद शांतीनाथ पाटील, श्री. योगेश श्रीकांत कबाडे, सौ. सुषमा संतोष जाधव, श्री. गणेश प्रकाश जोशी, श्री. निजाम आजमुद्दीन नदाफ, श्री. आकाराम सत्याप्पा चौगुले, श्री. मिलींद मोरेश्वर हारगे, श्री. मनोज गंगाराम दाभाडे, श्री. विश्वास बाबासो यादव - पाटील, श्री. झाकीर हुसेन इ. चौगुले, श्री. हुनरसिध्द ई. बिराजदार, श्री. राजेंद्र सखाराम कांबळे



# दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.

MMCCS

## सभासदांच्या माहिती करिता

खुशखबर !! खुशखबर !! खुशखबर !!



| ठेवीचा प्रकार | व्याज दर |
|---|---|
| कर्ज मुदत ठेव | ७% |
| संचित ठेव | ७% |
| पिग्मी ठेव | ६% |
| बचत ठेव | ५% |
| मुदत ठेव | ७% |
| जेष्ठ नागरीक मुदत ठेव | ७.५% |



उपरोक्त संस्थेच्या मुख्य शाखा व सर्व विस्तार खिडकी कार्यालयात सभासद असलेल्या सभासदांना कळविण्यात येते की, दि. १८.३.२०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापक मंडळ सभेतील निर्णयानुसार, सद्यस्थितीत मध्यम मुदत कर्ज, अल्प मुदत कर्ज, उत्सव अग्रीम कर्जावर आकारला जाणारा द.सा.द.शे. ११ टक्के व्याजदर कमी करून दि. १.४.२०२३ पासून सरसकट द.सा.द.शे. १० टक्के आकारण्यात येईल व संचित ठेवीच्या ८० टक्के कर्जावरील सद्यिस्थतीतील व्याजदर १० टक्केऐवजी द.सा.द.शे. १ टक्का कमी करून सरसकट द.सा.द.शे. ९ टक्के आकारण्यात येईल. यांची सर्व सभासदांनी नोंद घेण्यात यावी.

-: मुख्य कार्यालय :-

आकाशवाणी आमदार निवास, तळमजला, ३०/३१, एच.टी.पारेख मार्ग, मुंबई - ४०००३२.
टेलिफोन नं. - ०२२-२२८४१३३०, २२८७६५६९ ई-मेल - mantralaya.society@gmail.com

कोकण भवन २७५७३१६१ मंत्रालय २२८५३१०४ आरे डेरी २९२७१८२०
कुर्ला डेरी २५२७१८५७ पालघर ७२६२८८८२९१ संकल्प भवन ८२९१८८५४६५


♦ संपादक : एम.एम. उर्फ भाऊसाहेब पठाण ♦ कार्यकारी संपादक : अशोक रामचंद्र शिंदे प्रकाशक-मुद्रक : श्री.एम.एम. उर्फ भाऊसाहेब पठाण यांनी कर्मचारी टाइम्स हे मासिक राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ साठी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीअल इस्टेट, केशवराव खाड्ये मार्ग, जेकब सर्कल, मुंबई ४०००११ येथे छापून राज्य सरकारी गट ड (चतुर्थश्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, ९, नवीन प्रशासन भवन, तळमजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालयसमोर, मुंबई ४०००३२ येथे प्रसिद्ध केले. शीर्षक सत्यापन क्रमांक ५२०२८ दिनांक ११/१०/२०२२ माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकारद्वारा प्राप्त. ♦ संपर्क संपादकीय : ९८९०९१६५८८, ९८२१३७४६२६, जाहिरात : ९८९०९१६५८८, ७९७२९२७०१५ वितरण : ९८९०९१६५८८, ९५०३५७९५५२ ईमेल : karmacharitimes@gmail.com वेबसाईट : www.karmacharitimes.com ♦ सर्व कायदेशीर बाबी मुंबई न्यायालयाच्या कक्षेत ♦ (प्रेरणास्थान : आदरणीय कै. र.ग.कर्णिक, संस्थापक : भाऊसाहेब पठाण)

Editor : M.M. Alias Bhausaheb Pathan Executive Editor : Ashok Ramchandra Shinde Publisher Printer : Shri. M.M. Alias Bhausaheb Pathan printed the magazine 'Karmachari Times' for State Government Group D (Class IV) Employee Central Federation at Plascote Industries, 23 Municipal Industrial Estate, Keshavrao Khadye Marg, Jacob Circle, Mumbai 400011. State Government Group D (Class IV) Employees Central Federation, 9, New Administration Building, Ground Floor, Madam Cama Marg, Opposite Mantralaya, Mumbai 400032. **Title Verification No. 52028 dated 11/10/2022 Received by Ministry of Information and Broadcasting, Government of India.** ♦ Contact - Editorial : 9890916588, 9821374626 ♦ Advertisement : 9890916588, 9503579552 ♦ Distribution : 9890916588, 9503579552
E-mail : karmacharitimes@gmail.com Website : www.karmacharitimes.com ♦ All Legal matter subject to Mumbai Jurisdiction